मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ४१ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च २०००

*(वर्धापनदिन पुणे पुरवणीसह)* (व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## तव स्मरण सतत स्फूर्तिदायी घडो



१०/०९/१९३८ - ०५/०२/२०००

### शोक प्रस्ताव

"मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक व अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ सखाराम मराठे यांच्या दि.५ फेब्रुवारी २००० रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळ या ठरावाद्वारे समस्त मराठे कुलबांधवांतर्फे तीव्र दुःख व्यक्त करीत आहे."

"कै. सुरेशभाऊंच्या कुटुंबियांच्या दुःखात समस्त मराठे कुलबांधव सहभागी आहेत. हे दुःख सहन करण्याचे सामर्थ्य परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना देवो व कै. सुरेशभाऊंच्या आत्म्याला दयाघन परमात्मा सद्गती देवो, अशी ही ईश्वरचरणी प्रार्थना ही सभा करीत आहे."

**विश्वस्त व कार्यकारी मंडळ सभा - १२.२.२०००**

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३

Marathe Pratishthan

# असे होते सुरेशभाऊ - कुलबांधवांच्या प्रतिक्रिया

## 'कसं जगावं, कसं वागावं' याचा वस्तुपाठ

श्रीमती सुलभाताई व कुटुंबीय यांस,
सविनय नमस्कार,

कै. सुरेशभाऊ मराठे प्रतिष्ठानचे सर्वस्व होते. एक तपाच्या प्रदीर्घ कष्टानंतर मराठे परिवाराचा **कुलवृत्तांत** (२री आवृत्ती) प्रसिध्द होण्यामागे कै. सुरेशभाऊंचा फार मोठा सहभाग होता. एका अर्थाने **हा अमोल संदर्भग्रंथ म्हणजे त्याचे स्मारकच आहे.**

इ. स. १९८० ते २००० या प्रतिष्ठानच्या कालखंडात कै. सुरेशभाऊंनी **अनेक माणसे प्रतिष्ठानच्या कार्याकरिता एकत्रित केली.** परस्परात आपलेपणा निर्माण व्हावा म्हणून अनेक उपक्रम पार पाडले. स्वार्थाने झपाटलेल्या या जगात अत्यंत निरपेक्ष बुध्दीने कार्य करणारे कार्यकर्ते त्यांनी निर्माण केले.

**तरुणांनी** नोकरीच्या मृगजलामागे न धावता **उद्योग प्रवण व्हावे** ही त्यांची प्रबळ इच्छा होती. प्रतिष्ठानच्या प्रत्येक मेळाव्यात कै. सुरेशभाऊ ही त्यांची इच्छा अत्यंत तळमळीने व्यक्त करीत असत. हा हेतू मनात धरून त्यांनी **उद्योग प्रेरणा हा उपक्रम** सुरू केला आणि प्रतिष्ठानमधे **उद्योग प्रवर्तन निधी** निर्माण केला.

कै. सुरेशभाऊ हे प्रतिष्ठानच्या कार्याशी एवढे एकरूप झाले होते की त्यांनी प्रतिष्ठानला सर्वार्थाने मदत केली असं म्हणणं म्हणजे उजव्या हाताने डाव्या हाताला मदत केली असे होईल.

**'कसं जगावं कसं वागावं'** हे कै. सुरेशभाऊनी आपल्या प्रत्यक्ष वागण्याने आम्हाला दाखवून दिले. आमच्यापैकी काही कार्यकर्त्यांपेक्षा कै. सुरेशभाऊ हे वयाने लहान असूनसुध्दा ते त्यांना वडील बंधूसारखेच वाटत.

अशी प्रेमळ पितृस्वभावी व्यक्ती निघून गेल्यामुळे तुम्हा कुटुंबियांना किती दुःख होत असेल याची कल्पनाच करवत नाही. आम्ही सर्वजण आपल्या दुःखात सहभागी आहो.

कै. सुरेशभाऊंच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचे मराठे प्रतिष्ठानची जे भावनिक नाते जुळले आहे ते असेच कायम रहावे अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे.

दि. १२ फेब्रुवारी २००० रोजी मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त व कार्यकारी मंडळाची शोकसभा आयोजित केली होती. या सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावाची प्रत सोबत जोडीत आहे.

आपला नम्र,
**ग. वि. मराठे**
कार्यकारी उपाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

## मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ

मराठे प्रतिष्ठानचा एक आधारस्तंभ, मा. सुरेशभाऊ मराठे अल्पशा आजाराने आपल्यातून निघून गेले. हा वियोग मराठे बांधवाना सहन करणे कठीण आहे.

मराठे प्रतिष्ठान व मा. सुरेशभाऊ हा एक अतूट बंध होता. आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्यानी स्वतःचा एक परिवार तयार केला होता. प्रतिष्ठानच्या ३/४ कार्यक्रमातून मला त्यांना भेटण्याचा योग आला. सभेमधे कितीही तणावपूर्ण वातावरण अथवा गरमचर्चा असली तरी आपल्या मृदू स्वभावामुळे सभेचा शेवट गोड झाल्याचं आम्ही पाहिलं आहे.

प्रतिष्ठान पुढे त्यांनी घालतेली शिस्त पुढील कार्यकर्त्यांना निश्चितपणे नवी प्रेरणा देईल याचा विश्वास वाटतो.

**राजा मराठे** (राजाराम नारायण पृ. २३५)
मालाड, मुंबई (फोन ३६९९०००)

## नेक उद्योगपती

*('धावते जग', महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, ९.२.२०००)*

महाराष्ट्रातील उद्योगधंद्यात अग्रेसर असलेल्या घराण्यांचा, विशेषतः मराठी उद्योगपतींचा विचार करताना, किर्लोस्कर, गरवारे, आपटे, चौगुले अशा ठराविक घराण्यांचीच नावे समोर येतात. या तुलनेत इतर अनेक उद्योजक नेकीने काम करत असूनही, समाजाने त्यांच्याकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले नाही.

अशांपैकी एक, सुरेश मराठे यांचे नुकतेच अकाली निधन झाले. ते स्विफ्ट्स लि. या कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक होते.

या कंपनीची स्थापना सुमारे पंचेचाळीस वर्षापूर्वी त्यांचे वडील (स्व.) अप्पासाहेब मराठे यांनी केली. १९६९ साली त्यांचे निधन झाल्यावर कंपनीची धुरा सुरेश मराठे यांच्या खांद्यावर आली.

अगोदर ही कंपनी मोटार कंपन्यांसाठी वाहनांचे सुटे भाग बनवत असे. सुरेश यांनी त्यातच समाधान न मानता, १९७२ साली भारतातले पहिले छोटे ऑफसेट मशिन बाजारात आणले. आपल्या या यंत्राच्या विक्रीसाठी त्यांनी भारतभर जाळे उभारण्यास सुरवात केली. मग उत्पादनवाढीसाठी त्यांनी १९८४ साली नाशिकला कारखाना उभारला. या दशकाच्या आरंभास जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे वारे वाहू लागल्यावर, सुरेश मराठे यांनी काळाची पावले ओळखून, पाच वर्षापूर्वीच एका अमेरिकन कंपनीशी तांत्रिक सहकार्याचा करार केला.

स्विफ्ट्सने या प्रकल्पांतर्गत तयार केलेल्या यंत्रांना भारतात तसेच जागतिक बाजारात मान्यता मिळाली. ही यंत्रे दर्जाच्या कसोटीवर टिकलीच; परंतु विक्रीनंतरच्या सेवेमुळे देखील ही कंपनी ग्राहकांमध्ये मानाचे स्थान मिळवून आहे.

सुरेश मराठे यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, ते मोठे उद्योगपती असूनदेखील, त्यांचे वागणे-बोलणे साध्या मध्यम वर्गीयाप्रमाणे होते. उद्योगपतींमध्ये असलेली चलाखी, स्वार्थ, आप्पलपोटेपणा त्यांच्यात औषधालाही नव्हता.

विविध औद्योगिक आणि सामाजिक संघटनांत ते क्रियाशील राहिले. आपल्या प्रयोगशील वृत्तीने व निगर्वी आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्वाने सुरेश मराठे यांनी छपाई उद्योगात आपली स्वतंत्र मुद्रा उमटविली आहे.

***

Marathe Pratishthan

# असे होते सुरेशभाऊ - कुलबांधवांच्या प्रतिक्रिया

### सामाजिक ऋण मानणारे द्रष्टे उद्योगपती

१९९७ चे मराठे कुलसंमेलनाचे निमित्ताने त्यांचेशी आमचा जवळून व घनिष्ट परिचय झाला. ते किती सर्वार्थाने मोठे उद्योगपती होते याची कल्पना महाराष्ट्र टाईम्स मधील "धावते जग" मधील स्फुटावरून आली. मात्र नित्याचे सहवासात त्यांनी हे मोठेपण कधीही जाणवू दिले नाही. ते आमच्या सारखेच सर्वसामान्य व्यक्तिमत्वात वावरायचे. आम्हाला आमच्यातील वाटायचे.

त्यांची औद्योगिक/व्यावसायिक भरारी तर फार मोठी होती. त्याप्रमाणे **काळाची गती ओळखण्याची दूरदृष्टी व कल्पकता** यांचा सुंदर संगम त्यांचे ठायी झालेला होता. ते केवळ उद्योजकच नव्हते तर **सामाजिक ऋण मानणारे** द्रष्टे कार्यकर्ते होते. अनेक सामाजिक त्याचप्रमाणे ब्राह्मण जातीशी संबंधित संस्थांचे ते आधारस्तंभ होते. **दीपस्तंभाप्रमाणे** ते आपल्या अंगीकृत संस्थाना **मार्गदर्शन** करीत.

कै. सुरेशरावांनी त्यांचे कारकीर्दीत प्रतिष्ठानचे वाढीसाठी ज्या निरनिराळ्या योजना आंखल्या होत्या, दूरदृष्टीने पुढे ठेवल्या होत्या, त्या मूर्तस्वरूपात आणणेसाठी सर्वांनी एकदिलाने झटणे व त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करणे हीच खऱ्या अर्थाने त्यांना श्रध्दांजली ठरेल.

- **भास्कर नरहरी** (पृ. ४६), रत्नागिरी.

### चित्तपावन समाजातील कर्तृत्ववान हिरा

चित्तपावन समाजातील मागील पिढीतील एक कर्तृत्ववान हिरा निखळला त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने आणि उद्योजकता व कल्पकता या गुणाने भावी पिढीसमोर आदर्श ठेवला होता.

आपल्या प्रतिष्ठानचे आधार स्तंभच काळाच्या पडद्यामागे गेल्यामुळे प्रतिष्ठानचे न भरून येणारे नुकसान झाले. त्याच बरोबर आपल्या समाजाचे हितचिंतक पडद्याआड झाल्यामुळे समाजाची अपरिमित हानी झाली आहे.

- **प्र. द. भावे,** कार्यवाह
अ. भा. चि. ब्रा. महासंघ, पुणे.

### प्रतिष्ठानचे कणखर नेतृत्व हरपले

आपल्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदरणीय सुरेशभाऊ मराठे यांचे अकाल निधनाचे वृत्त समजले. अतिशय दुःख झाले. एका कणखर नेतृत्वाचे निधनामुळे मराठे प्रतिष्ठानचे कधीही न भरून येणारे नेतृत्व हरपले आहे.

- **नंदकुमार मराठे** (सदानंद दिनकर, पृ. २१९), कोल्हापूर.

### धडाडीचे उद्योजक, सेवाभावी समाजसेवक

मराठे यांनी १९७२ मध्ये भारतातील पहिले छोटे ऑफसेट प्रिंटींग मशीन तयार करुन प्रिंटि उद्योगामध्ये क्रांती घडवून आणली. मराठे उद्योगसमूहास प्रगतीपथावर नेण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

व्यवसायाबरोबरच ब्राह्मण सेवा मंडळ व मराठे प्रतिष्ठान यांसारख्या समाजसेवी संस्थाचेही मराठे हे अध्यक्ष होते. या संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. एक धडाडीचे उद्योजक व सेवाभावी वृत्तीचे समाजसेवक म्हणून मराठे परिचित होते.

- *दै. लोकसत्ता, मुंबई (३.२.२०००)*

### महाराष्ट्र चेंबरचे सक्रिय सदस्य

सुप्रसिद्ध स्विफ्ट्स लिमिटेड या कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. सुरेशभाऊ मराठे यांचे दि. ५.२.२००० रोजी निधन झाले.

श्री. सुरेशभाऊ महाराष्ट्र चेंबरचे एक सक्रिय सभासद होते. वडिलांच्या निधनानंतर स्विफ्ट्स कंपनीची धुरा श्री. सुरेश मराठे यांच्यावर आली. १९७२ साली भारतातील पहिले ऑफसेट त्यांनी बाजारात आणले. या ऑफसेट मशिनचा भारतीय उद्योजकांना होणारा फायदा लक्षात घेऊन केंद्र सरकारने त्यांना आयात पर्यायी उत्पादनाचे पारितोषिक देऊन गौरविले. उत्पादन वाढीसाठी त्यांनी नाशिक येथे १९८४ साली कारखाना उभारला. काळाची पावले ओळखून त्यांनी एका अमेरिकन कंपनीशी तांत्रिक सहकार्याचा करार करून जागतिक बाजारात मान्यता मिळविली.

श्री सुरेशभाऊ मराठे उद्योगपती असून देखील त्यांचे वागणे - बोलणे साध्या मध्यम वर्गीयांप्रमाणे होते. विविध औद्योगिक आणि सामाजिक संघटनात ते सक्रिय भाग घेत असत.

*(महाराष्ट्र चेंबर पत्रिका, मुंबई, मार्च २०००)*

## लेखक नव्हे, संग्राहक सुरेशभाऊ

**हे चित्र पहा —**

महाराष्ट्रांतील एक लोकप्रिय लेखक-कथा-कादंबरी-नाटककार जयवंत दळवी यांची एक कथा लोकसत्ता मधे प्रसिध्द झाली. पुढच्याच आठवड्यांत तीच कथा, जशीच्या तशी नागपूरच्या एका साप्ताहिकांत दुसऱ्याच एका लेखकाच्या नांवाने प्रसिध्द झाली. त्या लेखकाला जयवंत दळवींनी याबाबत पत्र लिहिले. तर त्याने दळवींना कळवले, "उगाच गडबड करू नका. तुम्ही आम्ही सर्वच लेखक असे एकमेकांचे चोरत असतो. कोणी शैली चोरतात, कोणी मूळ कल्पना चोरतात. मला पुरेसा वेळ नव्हता म्हणून मी तुमची कथा जशीच्या तशी चोरली. पुढे केव्हा तरी तुम्ही माझी कथा चोरा. मी तक्रार करणार नाही." दळवी कपाळाला हात लावून बसले. **(संग्राहक - बाळ सामंत,** रविवार लोकसत्ता, मुंबई)

**— आणि हे चित्र पहा!**

आपली नैतिक जबाबदारी मानून सुरेशभाऊ 'हितगुज' साठी नियमितपणे मजकूर पाठवित असत.

मागील डिसेंबर ९९ चा हितगुज अंक तयार होताच रिवाजाप्रमाणे मी सुरेशभाऊंना दिला. त्यांनी अंक चांगला असल्याचे सांगितले. मात्र लगेच खुलासा केला, "अहो शिपायापेक्षा मंत्री होणे सोपे हा किस्सा काही माझा नाही. मी केवळ संग्राहक, लेखक नव्हे."

***दुसऱ्याचे श्रेय स्वतःला मिळू नये म्हणून केवढी ही जागरूकता. आजकाल दुर्मिळ अशी. अशा छोट्याछोट्या गोष्टीतच माणसाचा मोठेपणा दिसतो म्हणूनच सुरेशभाऊ 'ग्रेट' ठरले!*** - ***संपादक***

***



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळाच्या सभा**

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच चौथ्या शनिवारी सायं. ४ वाजता गरजेप्रमाणे कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचेमधे परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते. कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत डिसेंबर ११, जानेवारी ८, आणि फेब्रुवारी १२ व २६ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

डिसेंबर ९९ च्या हितगुजमध्ये "मराठे परिवार व्यक्तिसूची २०००" या शीर्षकाखाली मध्यप्रदेश निवासी कुलबांधवांची सूची प्रसिध्द करण्यात आली होती. ११ डिसेंबरला कार्यकारी मंडळाच्या सभेत याबाबत चर्चा झाली. माहितीचा प्रतिसाद पाहून त्यानंतरच **'स्थल निहाय मराठे परिवार २००० सूची (डिरेक्टरी)'** प्रसिध्द करण्यासंबंधी निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले. याप्रमाणेच **'घराणेवार सूची' तयार करण्याबाबत अग्रक्रमाने विचार व्हावा.** मात्र याबाबतचा प्रस्ताव लिखित स्वरूपांत कार्यकारी मंडळाच्या सभेत विचारार्थ ठेवावा व मगच निर्णय व्हावा असे ठरले.

जानेवारी ८ च्या सभेत सीताराम गोपाळ खांबेटे यांनी बडोदे, अहमदाबाद व इंदूर येथे गेले असता (२१ ते ३१ डिसेंबर) प्रतिष्ठानच्या कार्यविस्ताराच्या दृष्टीने तिथल्या मराठे कुटुंबीयांशी संपर्क साधून आजीव सदस्य व हितगुज तहहयात वर्गणीदार नोंदणी बाबत प्रशंसनीय केलेल्या कार्याची नोंद घेण्यात आली. या दौऱ्यात त्यांनी ३८ सभासद नोंदवले याबद्दल श्री. खांबेटे यांचे खास अभिनंदन करण्यात आले.

१२ फेब्रुवारी रोजी कार्यकारी मंडळ व विश्वस्त मंडळ यांची संयुक्त सभा घेऊन प्रतिष्ठानचे संस्थापक व अध्यक्ष सुरेशभाऊ यांच्या ५ फेब्रुवारी २००० रोजी झालेल्या अकल्पित निधनाबद्दल शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. या सभेला सुमारे २० कुलबांधव उपस्थित होते.

२६ फेब्रुवारीच्या सभेत पुण्याजवळ आकुर्डी येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात शिकणाऱ्या गिरीश विश्वनाथ मराठे याला फी भरण्यासाठी रु. ५००० अल्पकालीन बिनव्याजी कर्ज योग्य चौकशी करून द्यावे असे ठरविण्यात आले.

**वर्धापन दिन २६.१.२०००**

सालाबादप्रमाणे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन पुणे शाखेतर्फे २६.१.२००० रोजी साजरा करणात आला. या समारंभाचा वृत्तान्त आणि पुणेकर कुलबांधवांचे लिखाण याच अंकात संलग्न असलेल्या वर्धापनदिन पुणे पुरवणीत प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**देणग्या**

१. **सीमा मराठे** यांजकडून शिक्षण निधीसाठी रु. १००.
२. **गजानन चिंतामण** पुणे यांचेकडून वडिलांचे स्मृतीप्रीत्यर्थ शिक्षण निधीला रु. १०१.
३. **विष्णु मारुती** (पृ. ७५९) शिक्षण निधीसाठी रु. १०,०००.

**चुकीची दुरुस्ती :-** मागील अंकात परळ, मुंबई येथील सभासद चिंतामण महादेव (पृ. २२२) यांनी शिक्षण निधी व वैद्यकीय निधी यांसाठी दिलेली देणगी रक्कम प्रत्येकी रु. ५००० असे नजरचुकीने छापले गेले आहे. **ही रक्कम प्रत्येकी रु. ५००** आहे याची नोंद घ्यावी.

**उपसमित्यांचे कार्य**

वार्षिक सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार नियुक्त केलेल्या उपसमित्यांचे कार्य प्रभावीपणे व्हावे यासाठी कुलबांधवांनी आपले मौलिक विचार पाठवण्याचे आवाहन मागील अंकात करण्यात आले होते. याबाबतचा अत्यल्प प्रतिसाद पहाता कुलबांधवांनी आपली अनास्था झटकून टाकून हितगुजच्या माध्यमातून यासंबंधी विचारांचे आदानप्रदान व्हावे म्हणून आवर्जून आपले विचार पाठवावे असे पुन्हा एकदा आवाहन करण्यात येत आहे.

याच अंकात सौ. नीलांबरी मराठे यांनी 'पुणे शाखेचे मनोगत' व्यक्त करतांना उद्योग-व्यवसायांना चालना देण्यासाठी मांडलेल्या योजनेबाबत कुलबांधवांनी निश्चित स्वरूपाच्या सूचना/कल्पना पाठवल्यास उपयुक्त ठरतील.

***

## *असे होते सुरेशभाऊ - कुलबांधवांच्या प्रतिक्रिया*

### Gem of a Man

I did not know him personally too well, though from the few and infrequent meetings we had, I could see that he was bubbling with enthusiasm and orginal ideas. He also had the rare ability to translate his ideas into actualities and he spared no effort on his part in doing so; not to mention his leadership in this respect in carrying others with him, motivating and enthusing them, to develop a feeling of participation. He was liberal in giving credit to others, however little or unimportant a part they may have played in accomplishing the combined goal. In short he was a Gem of a Man.

- **प्रभाकर दत्तात्रय** (पृ. १८२), ठाणे (प.)

**विख्यात उद्योगपती सुरेश मराठे**

सुप्रसिध्द स्विफ्टस लिमिटेड या कंपनीचे अध्यक्ष सुरेशभाऊ मराठे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते.

मराठे उद्योग समूह या नावारूपाला आलेल्या उद्योगाचा पाया त्यांनी आधुनिक दृष्टिकोनातून पक्का केला. १९७२ मध्ये भारतातले पहिले ऑफसेट मशीन त्यांनी बाजारात आणले. इंडियन प्रिंटिंग पॅकेजिंग अँड अलाइड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी त्यांची दोनदा निवड झाली होती. 'ब्राह्मण सभा' व 'मराठे प्रतिष्ठान' या दोन संस्थांमार्फत त्यांनी अनेक समाजसेवी उपक्रम राबविले. धडाडीचे व समाजसेवी उद्योजक म्हणून त्यांची ख्याती होती.

("काळ, काम आणि वेग" साप्ताहिक, मुंबई, १०.२.२०००)



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**CA परीक्षेत पुण्यात पहिली**

**कु. अदिती वसंत** (पृ. ४५१), पुणे, ही नोव्हेंबर १९९९ मधे झालेल्या CA च्या परीक्षेत पुण्यात पहिली व भारतात ७वी आली. या अलौकिक यशाबद्दल अदितीचे खास अभिनंदन.

**नागपूरचे आर्किटेक्ट श्रीराम मराठे.**

नागपूर येथील **प्रख्यात आर्किटेक्ट श्रीराम रघुनाथ (पृ. २३६) यांचा** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स् या संस्थेच्या नागपूर शाखेतर्फे ११.९.१९९९ रोजी **मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार** करण्यात आला. वास्तुशास्त्राचा डिप्लोमा घेतल्यावर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. २७ वर्षे इंग्लंडमधे काम करून १९९७ मधे ते नागपुरांत परत आले व तिथे व्यवसाय चालू केला. अनेक विद्यार्थ्यांना प्रबंध (थीसिस) लिहिण्याबाबत त्यांनी यशस्वी मार्गदर्शन केले आहे.

**राधा मराठे यांना**
**बिनधास्त प्रतिक्रिया पारितोषिक**

बिनधास्त या चित्रपटाबाबत प्रतिक्रिया पाठवण्याचे आवाहन चित्रपटाच्या निर्मात्यांनी केले होते. या स्पर्धेत अंधेरी तेथील कुलभगिनी **सौ. राधा श्रीकांत (पृ. ३७८)** यांच्या 'बिनधास्त' प्रतिक्रियेला निर्मात्यांकडून पारितोषिक मिळाले आहे. (त्यांचा लेख पुढील अंकात पहावा.)

### खुषीपत्र

आजच 'हितगुज' मिळाला. वाचन चालू आहे. संगणकाची समस्या Y2K हा माहितीपूर्ण लेख, जपानमध्ये वेगळं काय आहे, हा लेख तसेच मराठे कुलबांधवांतला पहिला 'शेट्टी' हे सर्व वाचले. असे वाचनीय लेख नेहमी छापावे. असे आणखीही 'शेट्टी' लवकर पुढे येतील ही आपली मनीषा पूर्ण होवो ही सदिच्छा! अंक नेहमी सारखाच 'दर्जेदार'


- **सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ. ६५८),
मुद्रे बुद्रुक कर्जत-रायगड

## नांदा सौख्यभरे

**मागील तिमाहीत खालीलप्रमाणे कुलबांधवांच्या मुला-मुलींचे विवाह झाले.**

| मराठे कुटुंबीय वधू/वर | विवाह कोणाशी झाला | विवाहाची तारीख |
|---|---|---|
| **अच्युत महादेव चक्रदेव** (पृ. ७३२) पुणे **यांचा मुलगा हेरंब** तथा प्रसाद | मुकुंद रघुनाथ केळकर, यांची कन्या तेजस्विनी तथा सारिका | २९.११.१९९९ |
| **वसंत दिनकर खांबेटे** (पृ. ६७०) इंदौर, **यांची कन्या वृषाली** | डॉ. कृष्णाराव गो. पतकी यांचा पुत्र अनंत | २९.१२.१९९९ |
| **शरद शंकर खांबेटे** (पृ. ६७६) पुणे, **यांचा पुत्र सारंग उर्फ प्रशांत** | चि. सौ. कां. गौरी | ३.१.२००० |
| **वसंत भालचंद्र** (पृ. १६२), पनवेल, **यांची कन्या दीपाली** | श्री. श्रीकांत (कांता) जोशी यांचा मुलगा विनय | ३.१.२००० |
| **मोहन बाळकृष्ण** (पृ. ५२०) मंगेशी, गोवा, **यांचा पुत्र हेमंत** | श्री. मनोहर पांडे, पुणे यांची कन्या मीनल | ८.१.२००० |
| **प्रकाश गणेश विद्वांस** (पृ. ६४५) अहमदाबाद, **यांचा पुत्र मिलिंद** | अशोक विष्णु आपटे यांची कन्या शिल्पा | १५.२.२००० |
| **कमलाकर नरहरी** (पृ. ४६), ठाणे, **यांची कन्या पौर्णिमा** | केदार शंकर घाणेकर, रत्नागिरी | १५.२.२००० |
| **नागभूषण गोविंद** (पृ. ५७०), कारकल, **यांचा पुत्र पद्मनाभ** | गंगाधर व्ही. फडके यांची कन्या रूपा | ९.३.२००० |

**चित्रकार इंजिनियर मंदार मराठे**



**मंगेशी, गोवा, येथील कुलबांधव मंदार मोहन** (पृ. ५२०), हे सीमेन्स कंपनीत इंजिनिअर म्हणून नोकरी करतात. सीमेन्सच्या स्पोर्टस व कल्चरल टीम तर्फे त्यांच्या पेंटिंग्ज्चे प्रदर्शन मे १९९९ मधे झाले. त्यांची काही लँडस्केप्स् परदेशात सीमेन्स कंपनीच्या मुख्य कार्यालयातहि पोचली आहेत. त्यांच्याच एकट्याच्या लँडस्केप्स्चे (वॉटरकलर) स्वतंत्र प्रदर्शन (२८ चित्रे) कळंगुट येथील आर्ट गॅलरीत नोव्हें - डिसें. १९९९ मधे झाले. त्यांची काही चित्रे इंटरनेटवरहि उपलब्ध आहेत. पत्ता :- www.geocities.com/SoHo/Courtyard/7691

### पहिला 'शेट्टी' अजून 'अद्वितीय' च!

कुलवृत्तांताचे संपादक **विनायक गोपाळ** (पृ. ६९) यांनी उद्योग प्रवर्तन निधीसाठी रु. १० हजाराची (त्यांच्याच **शब्दात**) 'छोटीशी देणगी' देऊन 'मराठे कुळांतला पहिला शेट्टी' होण्याचा मान मिळवल्याचे मागील अंकात (पृ. ३) आपण वाचले असेलच. अद्याप आणखी असे 'शेट्टी' पुढे आलेले नाहीत. आणखी शेट्टी लवकरच पुढे येतील अशी आशा नव्हे खात्री बाळगतो. - **संपादक**



Marathe Pratishthan

## सहवेदना

१) **पुणे येथील सभासद रामचंद्र चिंतामण** (पृ. २४६) यांचे २ ऑक्टोबर १९९९ रोजी निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते.

२) **गांधीधाम,** कच्छ, गुजरात **येथील सभासद रविंद्रनाथ दत्तात्रय (पृ. ६०२)** यांचे १४.११.९९ रोजी गांधीधाम येथे निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते.



३) **पुण्यातील सुप्रसिध्द वैद्य रामचंद्र शिवराम** (पृ. ४१) यांचे २३.१२.९९ रोजी निधन झाले. त्यांचे वय ९८ वर्षे होते. आयुर्वेद रसशाळा, आयुर्वेद महाविद्यालय, ताराचंद रुग्णालय इ. संस्थांच्या उभारणीत त्यांचा महत्वाचा वाटा होता. तसेच ते आयुर्विद्या मासिकाचे संस्थापक संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कारभारी मंडळाचे अनेक वर्ष सभासद होते. त्यांच्या आयुर्वेद प्रचार-प्रसार कार्याबद्दल अण्णासाहेब पटवर्धन पुरस्कार, वैद्य खडीवाले पुरस्कार व नानल शास्त्री पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता.

४) प्रतिष्ठानचे सभासद **अविनाश बळवंत (पृ. ३०) यांचे वडील बळवंत विष्णु** यांचे २५.१.१९९९ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी तर **त्यांची आई लक्ष्मीबाई बळवंत** यांचे २७.२.१९९९ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.



५) मराठी, हिंदी (व गुजराथीहि) चित्रपटसृष्टी आपल्या नृत्याभिनयाने सुमारे ३० वर्षे गाजवणाऱ्या, **मुंबईच्या माजी नगरपाल, उषा किरण** (उषा बाळकृष्ण - पृ. १९०) यांचे ९.३.२००० रोजी नाशिक येथे त्यांचा मुलगा अद्वेत खरे यांच्या निवासस्थानी कर्करोगाने निधन झाले. त्यांचे उषःकाल हे आत्मचरित्र वाचनीयता व लिखाणांतील प्रामाणिकपणा यांमुळे लोकप्रिय झाले. त्या खाजगी जीवनातहि यशस्वी आदर्श गृहिणी होत्या.

***

**प्रतिक्रिया**

### *या युवकांना झालंय तरी काय?*

(डिसेंबर १९९९ च्या 'प्रासंगिक' बाबत **सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ. ६५८) मुद्रे बुद्रुक, कर्जत-रायगड, यांचे विचार)

तरुण पिढी बिघडत चालली आहे असे म्हणण्यात मला काही तथ्य वाटत नाही. याला कारण सर्व समाजच आहे ना? आज तरुण पिढीने आदर्शाने वागावयाचे ठरविले तर समाजाकडून देखील तेवढाच प्रतिसाद मिळावयास नको का? आदर्श बाळगावा अशा दुर्मिळ घटना घडून चालणार नाहीत. तर त्या वारंवार घडल्या पाहिजेत, तरुण-तरुणींनी ज्यांच्यापासून आदर्श घ्यावा असा फार मोठा समाज त्यांच्या अवतीभवती असला पाहिजे. लोकसंख्या वाढीचा भस्मासूर देखील याला बऱ्याच अंशी जबाबदार आहे. असलेल्या समस्यांपैकी जास्तीत जास्त समस्यांचे मूळ हेच आहे असे मला वाटते.

आज मानवजातीला तारणार असेल तर श्रीमद्‌भगवद् गीतेतील विचारच तारू शकतील असा मला दृढ विश्वास वाटतो. मानवी जीवनाचे कोडे उलगडून दाखवणारा, प्रत्येक समस्येवर निश्चित उपाय सांगणारा, जीवन अंतापर्यन्त यशस्वीपणे जीवन जगण्याचा मंत्र सांगणारा हा ग्रंथ घराघरात अभ्यासला जावा असे मला वाटते.

***

### *अणुऊर्जा व उपयोग*

मी ३१ वर्षाहून अधिक काळ भाभा अणुसंशोधन केंद्रात काम करून निवृत्त झालो. अणु-अणुऊर्जेबद्दल सर्वसामान्यातही बरेच कुतूहल असते. मी लिहिलेले 'अणुऊर्जा व उपयोग' हे पुस्तक नुकतेच प्रसिध्द झाले आहे. विद्यार्थी व इतरांनाहि हे पुस्तक उपयुक्त आहे. किंमत रु. ७५. शिक्षणसंस्था व मराठे परिवारातील बांधवांना २५% सवलत. **संपर्क :** डॉ. सुरेंद्रनाथ गणेश मराठे (पृ. २८४), ३/५९, एम्. आय. जी. कॉलनी, चित्तरंजन नगर, राजावाडी, घाटकोपर, मुंबई - ४०० ०७७. फोन : ५११ ३८५३

### ब्राह्मण समाजावरची आपत्ती

महाराष्ट्र ब्राह्मण मंडळाचे दहावे वार्षिक स्नेहसंमेलन मालवण येथे रविवार दि. १६.१.२००० रोजी पार पडले. याप्रसंगी प्रसिध्द साहित्यिक व पत्रकार **ह. मो. मराठे** (हनुमंत मोरेश्वर, पृ. ५३७) यांचे भाषण झाले. ते म्हणाले, पूर्वी जातीजातीत मतभेद होते, थोडी तेढ होती. पण आज हा जातीजातीतील विद्वेष राजकारण्यांनी वाढविला आहे. व्ही. पी. सिंगांनी मंडल आयोग स्वीकारल्यावर सामाजिक परिस्थिती फार बदलली. यातून ब्राह्मण समाजावर खरी आपत्ती आली.

पण तिला 'आपत्ती' न समजता 'इष्टापत्ती' समजले पाहिजे. समोरचा हमरस्ता बंद होतो तेव्हा आपण बाजूच्या वाटा शोधतो. आरक्षणाने आपल्या नोकरीच्या वाटा बंद झाल्या आहेत. आणि सरकारी नोकऱ्याही शिल्लक नाहीत म्हणूनच राखीवता ही आपल्याला पूर्व सूचना समजून आपण व्यवसाय क्षेत्राकडे वळले पाहिजे. आपण इतर जातींचा द्वेष करू नये असा सल्लाही त्यांनी दिला.

***कुलबांधवांना उद्योग व्यवसाय क्षेत्रांत पदार्पण करण्यास मदत, मार्गदर्शन देऊन प्रोत्साहित करण्याचे कार्य मराठे प्रतिष्ठान प्रयत्नपूर्वक करीत आहे. या कार्याला वेग व परिणामकारकता प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपल्यासारख्या कल्पक पत्रकारांचे सहकार्य निश्चितच मोलाचे ठरेल. आमचा अपेक्षाभंग तर नाही ना होणार?*** - *संपादक*



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

***हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.***

***कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.***

**क्र. १/२००० वधू :** शुभांगी माधव विद्वांस, जन्म ११.९.१९६५, उंची ४' १०'', रंग गोरा, शिक्षण B.Com. D.B.M., नोकरी बरोज वेल्कम स्टेनो सेक्रेटरी, रक्तगट A-RH. Negative वडील निवृत्त S.T. तून, आई महापालिकेतून निवृत्त प्रा. शिक्षिका, १ भाऊ, १ बहीण विवाहित, **अपेक्षा** - अनुरूप शिक्षण, नोकरी-जागा हवी, **संपर्क** - मा. वि. विद्वांस, डी-३६, ओम मयूरेश सोसायटी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१. फोन : ५६९ १८५१.

**क्र. २/२००० वर :** सुधांशु सुदाम डोके, जन्म १६.५.१९७२, उंची ५' १०'', रक्त गट A-RH +ve, धर्म हिंदू-ब्राह्मण, शिक्षण J. J. School of Art Bombay, चष्मा नाही. देखणा, गहूवर्ण, **व्यवसाय/नोकरी-** F.C.B Ulka Advertising Ltd. (Creative Consultant) मासिक प्राप्ती रु. २० हजार, **कौटुंबिक माहिती** आई आहे, वडील नाहीत, बहीण आहे. पत्रिका बघणे आहे. (वराचे राहणीमान संपूर्ण ब्राह्मणी पध्दतीचे, शाकाहारी, आई कोकणस्थ ब्राह्मण, वडील माळी. आंतरजातीय विवाह.) **अपेक्षा** - शक्यतो कोकणस्थ अन्यथा कोणत्याही ब्राह्मण शाखेची, मध्यमवर्णी, पदवीधर, बँक, कॉलेज चांगल्या कंपनीतील कायम नोकरी, कर्जत पासून दादरपर्यंतच्या अंतरापर्यंतची. संगीत किंवा अन्य कलेची आवड असणारी. शाकाहारी. **संपर्क** - ''चैतन्य'', सावरकर रोड, डोंबिवली पूर्व, फोन : ४७२५०७.

**क्र. ३/२००० वधू :** मराठे पुष्पा सुधाकर, जन्म २०.१०.१९७६, शिक्षण B.A., नोकरी सुबोध विद्यालय, उंची ५ फूट, गोत्र कपि, ब्लड ग्रुप :- 'ओ' पॉझिटिव, **संपर्क** -- सुधाकर त्रिंबक मराठे, गोखले वाडा, घर नं. ४/२६ स्टेशन रोड, भाईंदर (प.), फोन नं : ८१९३५७३

**क्र. ४/२००० वर :** कुंदन विलास रुईकर, देशस्थ यजुर्वेदी, गोत्र भारद्वाज, जन्म - २.४.७१, शिक्षण - J. J. मुंबई येथील कमर्शिअल आर्टस् नोकरी - अक्षय संचय मधे कन्सलटंट व स्वतंत्र व्यवसाय. मा. उ. १२००० उंची - ५' ८'', गोरा सडपातळ. पत्रिका पहायची आहे. मुलाला आई व १ धाकटा भाऊ. आई व भावाला कोड आहे. मुलाला नाही. **संपर्क** - श्रीमती वैशाली वि. रुईकर, प्रियदर्शनी सोसायटी बी-३, गणेश मळा, वडाच्या गणपतीजवळ, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०३०.

**क्र. ५/२००० वर :** राजेश अशोक मणूरकर, देशस्थ, गोत्र भारद्वाज, जन्म १८.९.७१, B.C.S. M.B.A. सुदर्शन केमिकल कंपनीमधे सिनीयर ऑफीसर, ७५०० रु., उंची ५' ८'', गहूवर्ण मध्यम बांधा. आई, वडील व १ विवाहित बहीण. **अपेक्षा** - पदवीधर व स्मार्ट हवी. **संपर्क** - अशोक गोविंद मणूरकर, गौरी कुंज बिल्डींग, ब्लॉक नं. ६ अ, हॅपी कॉलनी, लेन नं. ३, कोथरूड पुणे, फोन - ५४४८९६५.

**क्र. ६/२००० वर :** विद्यासागर भास्कर देशपांडे (पोळेकर), उंची ५' ५'' जन्म २५.३.७३, D.M.E. व D.M.M. गहू वर्ण, सडपातळ, गोत्र कृपाचार्य. खाजगी कंपनीत नोकरी. मा. उ. ५००० रु. आई, वडील, १ विवाहित बहीण व १ लहान भाऊ. (नोकरी करतो) **अपेक्षा** - पदवीधर किंवा D. Farm असावी. एकत्र कुटुंबात राहणारी. **संपर्क** - भास्कर गोविंद देशपांडे, ३८४ महात्मा फुले पेठ, देशपांडे वाडा, पुणे ४११ ०४२.

**क्र. ७/२००० वर :** संदीप दिनकर बेलसरे, जन्म २६.२.७१, उंची ५' ८'', गोत्र भारद्वाज, शिक्षण १२ वी, देशस्थ ऋग्वेदी. टूरिस्टचा व्यवसाय व कॅसेटचे दुकान, ७००० रु., सडपातळ, सावळा. आई, वडील व १ विवाहित भाऊ आहे. **अपेक्षा** - १० वी शिवणकाम येणारी. गृहकृत्यदक्ष. **संपर्क** - श्री. दिनकर भिकाजी बेलसरे, लक्ष्मी नगर, चाळ नं. ९, खोली नं. ६५ पुणे - ४११ ००९.

**क्र. ८/२००० वर :** अजित चंद्रकांत मराठे, कोब्रा, गोत्र कपि, जन्म २९.१०.६८, B.Com. खाजगी नोकरी (अकौन्टस क्लार्क), ५००० रु., उंची ५' ६'', वर्ण गोरा, मध्यम बांधा. आई शिक्षिका, वडील निवृत्त पोस्टातून. १ बहीण विवाहित. **अपेक्षा** - पदवीधर, कोकणस्थ, चष्मा नको, पत्रिका पहाणे. **संपर्क** - चंद्रकांत बळवंत मराठे, १६/१२६ महर्षि नगर, पुणे ४११ ०३७, फोन - ४३३९०७६.

***

## Gratefulness

I received Rs. 30,000 as financial aid between 1997 - 99 for my Bachelors course in Electronics Engineering from M.I.T. College, Pune. This was of immense help. I obtained the BE Degree in 1999, with 58% marks & have secured a job from 1.11.1999 and would like to repay the loan as required.

**- किरण विनायक खांबेटे**
(पृ. ६७६) पुणे



Marathe Pratishthan

# पुण्यातील २१ वा वर्धापनदिन सोहळा : २६-१-२०००

**सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २८०) पुणे. (फोन : ४४५६२७०)

मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेने मागील शतकातील परंपरा नव्या शतकातही चालू ठेवल्यामुळे २६ जानेवारी २००० या गणराज्याच्या शुभदिनी मराठे प्रतिष्ठानचा २१ वा वर्धापन दिन वेदशास्त्रोत्तेजक सभागृहात दिमाखाने पार पडला. या सोहळ्यात पुण्यनगरीतील व पुण्याबाहेरील मिळून साधारण १५० कुलबांधव उपस्थित होते.

सभागृहाच्या प्रवेशद्वारात **सौ. सुवर्णा मराठे व त्यांची कन्या प्राजक्ता** यांनी मन प्रसन्न करणारी, मोराचा गालीचा असलेली **सुंदर रांगोळी** रेखाटली होती. ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

**सौ. प्राची मराठे यांनी गायलेल्या भूप रागातील इशस्तवनाने** कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यांचा स्टेजवर येऊन लोकांसमोर गाण्याचा हा पहिलाच अनुभव होता. परंतु त्यांनी व्यवस्थित पूर्वतयारी करून आत्मविश्वासाने उमेशाच्या आराधनेचे स्तवन गायले. त्यांना पेटीची साथ डॉ. राजेंद्र, तबल्याची साथ सी. व्ही. गानू आणि तंबोऱ्याची साथ अपूर्वा गानू यांनी अतिशय सुरेख केली होती. सुरेख साथ आणि सुरेल आवाज यांच्या मिश्रणाने सौ. प्राची मराठे पहिल्यांदाच गात आहेत हे खरे वाटत नव्हते. अगदी मुरलेल्या गायकाप्रमाणे त्या गात होत्या.

ईशस्तवनानंतर मराठे प्रतिष्ठानचे **ट्रस्टी श्री. अरविंद मराठे यांनी दीपप्रज्वलन** केले. शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवलेला **सुव्रत प्रफुल्ल चक्रदेव** याचा यावर्षी शालांत परीक्षेत २६ वा आल्याबद्दल आणि NTS ची स्कॉलरशिप मिळवल्याबद्दल रोख बक्षीस, श्रीफल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच **नमिता अनिल मराठे** हिने देवास (मध्यप्रदेश) येथे नुकत्याच झालेल्या ४५ व्या राष्ट्रीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटाचे प्रतिनिधित्व केले. या तिच्या बहुमानाबद्दल श्रीफल व गुलाबपुष्प देऊन तिचाहि सत्कार करण्यात आला.

यानंतर मुंबईतर्फे होणाऱ्या बक्षिस समारंभास पुण्यातील जे विद्यार्थी उपस्थित राहू शकले नव्हते त्यांना प्रशस्तीपत्रक, श्रीफल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यामधे सुव्रत प्रफुल्ल चक्रदेव, **आर्चिस रविंद्र** मराठे, **पद्मालया गजानन** मराठे, **शीतल गजानन** मराठे या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

प्रतिष्ठानचा हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचाही श्रीफल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे **अध्यक्ष श्री अरविंद मराठे** यांनी थोडक्यात खुसखुशीत भाषण करून सर्वांना आपलेसे केले.

त्यानंतर डॉ. सुरेंद्रनाथ मराठे यांनी अणुऊर्जा व त्याचे उपयोग या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाची माहिती थोडक्यात सांगितली. ते म्हणाले की अणुबाँबची माहिती आपणा सर्वांना आहे. परंतु अणुविघटनामुळे होणारे जे अनेक फायदे आहेत त्याचा उपयोग समाजाने करून घेतला तर विकासाला नवी चालना मिळू शकेल.

**श्री. सीताराम खांबेटे** यांनी प्रतिष्ठानच्या विविध योजना सांगितल्या **सौ. माधुरी खांबेटे** या हिंगणे कॉलेजमधील प्राध्यापिका आपला शोध निबंध सादर करण्यासाठी कोरियाला गेल्या होत्या. त्यांनी **कोरियातील समाजजीवनाचे आपले अनुभव** अत्यंत आकर्षक भाषेत कथन केले. जर कोरियाला जायला संधी मिळाली तर प्रत्येकाने अवश्य जावे असे त्यांनी सर्वांना आवर्जून सांगितले.

**श्री. गजानन मराठे** यांनी 'आयकर एक समस्या आणि त्यावरील उपाय' या विषयावर अतिशय उपयुक्त माहिती सांगितली आयकर कोणाला लागू होतो, आयकर पत्रके केव्हा दाखल करायची, आयकर उत्पन्नाचे दर, सवलती अशा विविध मुद्यांवर तपशीलवार माहिती दिली. आयकरासंबंधी जर कोणाला काही अडचणी असतील तर त्या सोडवण्याकरता योग्य ती मदत मी करू शकेन असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

त्यानंतर श्रीमती **शैलजा मुकुंद मराठे** यांनी जागेच्या संदर्भात कुलबांधवांना एक आवाहन केले होते ते म्हणजे 'बेळगाव येथील एक एकर काही गुंठे आमराई विकणे आहे.' संपर्कासाठी पुणे येथील फोन नंबर ५५३१८७६.

समारंभाची संध्याकाळ **श्री गणेश मोरेश्वर जाईल यांच्या सुश्राव्य संगीताने** न्हाऊन निघाली. त्यांनी अतिशय बहारदार आवाजात नाट्यगीते व भजने सादर केली. त्यात साईबाबांचे एक भजन व काव्य संगीत त्यांनी स्वतः रचले होते. ते या समारंभात आवर्जून सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली. त्यांना त्यांच्या पत्नीने पेटीवर व सुपुत्राने तबल्यावर साथ केली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **सौ. नीलांबरी मराठे** यांनी अत्यंत शैलीदार व नेटक्या शब्दात केले.

कार्यक्रमाची सांगता **सौ. श्रीलेखा मराठे** यांनी स्वखर्चाने व **स्वहस्ते बनवलेला सुंदर अल्पोपहार** देऊन झाली. त्यांनी केलेला चिवडा, चिरोटा व तिळगुळाची वडी अतिशय रुचकर झाली होती.

पुढील काही बाहेरगांवची मंडळी हितगुजमधे वाचून आमच्या या कार्यक्रमाला उपस्थित राहिली त्याबद्दल पुणे शाखेतर्फे त्यांना धन्यवाद!

१) श्री. दत्ताजय आत्माराम मराठे - मुलुंड
२) डॉ. सुरेंद्रनाथ मराठे - मुंबई
३) ट्रस्टी श्री अरविंद मराठे - मुंबई
४) श्री. सी. वा. मराठे - देवळाली - नाशिक
५) श्रीमती मीना गोडसे - कुर्ला - मुंबई
६) श्री. नंदकुमार रामचंद्र मराठे - बेळगांव (सध्या पुण्यात वास्तव्य)

२६ जानेवारीच्या कार्यक्रमासाठी पुढील कुलबांधवांनी देणगी दिली. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद!

१) डॉ. श्री. अशोक मराठे १००० रु.
२) विंग कमांडर श्री. य. ल. मराठे २५१ रु.
३) श्री एस. जी. मराठे १०० रु.
४) देणगी पेटीतील जमा २५१ रु.

(श्रीधर आत्माराम मराठे यांच्या मागच्या वर्षीच्या सूचनेनुसार देणगी पेटी ठेवली होती.)

***



Marathe Pratishthan

# वर्धापनदिन सोहळयाची क्षणचित्रे

## सत्कार गुणवंतांचा



प्रफुल्ल चक्रदेव



आर्चिस रविंद्र मराठे



नमिता अनिल मराठे

## सत्कार कलावंतांचा



श्री. गणेशबुवा जाईल



सौ. विद्या जाईल



सौ. प्राची रविंद्र

## सत्कार कार्यकर्त्यांचा



सौ. श्रीलेखा मराठे



श्री. अच्युत चक्रदेव



सौ. सुवर्णा मराठे

Marathe Pratishthan

# पुणे शाखेचे मनोगत

**सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २८०) पुणे. (फोन : ४४५६२७०)

मराठे प्रतिष्ठानचा वर्धापन दिन पुणे शाखेतर्फे दरवर्षी २६ जानेवारीला साजरा केला जातो. सर्व कुलबांधव आणि त्यांच्या कुटुंबियांनी एकत्र यावे, परस्पर परिचय करून घ्यावा. परिचयाचे रूपांतर स्नेहात व्हावे, दिवसेंदिवस त्यात वृध्दी व्हावी, नवोदित कलाकारांना स्टेजची संधी मिळावी हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. म्हणून आम्ही दरवर्षी पुण्यातील सुमारे ४५० कुलबांधवांच्या घरी पत्रे पाठवतो. एका कुटुंबात सरासरी ४ लोक धरले तर १८०० लोकांपर्यंत आमचे पत्र जाऊन पोचते. परंतु कार्यक्रमाला जेमतेम १५० ते १६० लोक उपस्थित असतात. त्यामधे **तरुणांचा सहभाग** तर अगदीच **नगण्य असतो याचे फार वाईट वाटते.**

जे लोक उपस्थित असतात त्यापैकी निम्मे लोक आपल्यापैकी कोणाचा तरी सत्कार, व्याख्यान किंवा करमणुकीचा कार्यक्रम आहे म्हणून आलेले असतात. आपल्याशी संबंधित व्यक्तीचा कार्यक्रमातील सहभाग संपला की ही मंडळी निघून जातात. खडकी, पिंपरी, चिंचवड, तळेगांव, लोणावळा येथे राहणाऱ्या लोकांचे मी समजू शकते. परंतु अगदी जवळ राहणाऱ्या लोकांनासुध्दा घरी जायची खूप घाई झालेली असते. त्यामुळे शेवटी उपस्थिती खूपच कमी असते.

पूर्वी नवोदित कलाकारांना कला सादर करण्यासाठी स्टेजची संधी मिळावी म्हणून विविधगुणदर्शनाचे कार्यक्रम करून जास्तीत जास्त व्यक्तींना व मुलांना त्यात संधी देत होतो. त्यामधे गायन, वादन, नृत्य, कथाकथन, नकला, स्लाईड शो अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असे. परंतु **जास्तीत जास्त व्यक्तींना संधी दिल्यामुळे कार्यक्रम खूपच लांबायचा.** शेवटच्या कलाकारांना प्रेक्षक किंवा श्रोते खूपच अल्प प्रमाणात असल्यामुळे कलाकार व कार्यकर्त्यांचा उत्साहच कमी व्हायचा.

या सर्व अनुभवांची दखल घेऊन **कार्यक्रमाची लांबी आम्ही आता खूपच कमी केली आहे.** आता तीन तासापेक्षा जास्त कार्यक्रम ठेवत नाही.

असे हे विविध अनुभव घेऊन, आलेल्या सूचनांची दखल घेऊन, मराठे कुलबांधवांचा मेळावाच वर्धापन दिनाचे निमित्त साधून भरवत असतो. त्यामधे **दरवर्षी वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न** असतो. सर्व पुणेकर कुलबांधवांनी आपल्या कुटुंबियांसमवेत यावे ही माफक अपेक्षा असते. २६ जानेवारीला राष्ट्रीय सण असल्यामुळे सुट्टी असते. ध्वजवंदनाशी संबंधित कार्यक्रम सकाळीच होऊन जातात. त्यामुळे वैयक्तिक कामे सोडली तर बहुतेकांची संध्याकाळ मोकळी असते. तरीसुध्दा आपण आपल्या कुलबांधवांच्या सानिध्यात वर्षातील एका संध्याकाळचे तीन ताससुध्दा घालवू शकत नाही याबद्दल खंत वाटते.

वर्षातून एकदाच हा जो कार्यक्रम होतो तो आपणास आवड नाही का? उपस्थिती वाढवण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करता येतील? कार्यक्रमामधे काही बदल करणे आवश्यक आहे का? असल्यास कोणत्या प्रकारचा? तरूण मुलांचा सहभाग वाढवण्यासाठी काय करता येईल हे आपणच सुचवावे. तुमच्या सूचना व विचारांचे स्वागतच होईल.

ज्यांना प्रतिष्ठानच्या कार्याच्या वृध्दीसाठी काम करण्याची इच्छा असेल त्यांना पुढीलपैकी कोणत्या प्रकारचे काम करणे आवडेल व जमेल ते मोकळेपणाने कळवावे ही विनंती :-

१) कुलबांधवांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी चर्चा करून त्यांची मते जाणून घेणे.
२) आजीव सभासद आणि हितगुजचे वर्गणीदार करून घेण्यासाठी कुलबांधवांना भेटणे. त्यासाठी आपल्या सोईचा विभाग कळवणे. म्हणजे घरी जाऊन प्रत्यक्ष संपर्क साधणे सोईचे होईल.
३) हितगुजसाठी जाहिराती जमा करणे.
४) कुलबांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, आवश्यक तेथे प्रतिष्ठानची मदत घेणे.
५) शैक्षणिक विकास, वैद्यकीय मदत, हितगुज आणि विविध योजनांसाठी आर्थिक सहाय्य करणे.
६) कुलबांधवांना भेटून त्यांच्याकडून वरील उपक्रमांसाठी देणग्या जमा करणे.
७) हितगुजसाठी लेखन करणे.
८) कुलवृत्तांतामधे काही व्यक्तींची माहिती अपूर्ण किंवा थोटक आहे ती माहिती व्यवस्थित जमा करून प्रतिष्ठानला कळवणे.
९) प्रतिष्ठानच्या विकासासाठी व वृध्दीसाठी विविध सूचना करून त्याची अंमलबजावणी करणे.
१०) २६ जानेवारीच्या वर्धापनदिन समारंभाच्या आयोजनात सहभाग घेणे.

**प्रमोद चक्रदेव** यांनी ९५ साली सूचना केली होती की सर्व कुलबांधवांचे परस्पर परिचय करून घ्यावे म्हणजे ओळखी होतील. परंतु सर्वांचा परिचय करून घेणे हा कार्यक्रम खूप कंटाळवाणा होतो. म्हणून पुढे सलग २, ३ वर्षे सर्वांचा परिचय करून न देता व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी त्यांचा स्वतःचा व त्यांच्या व्यवसायाचा परिचय करून देण्याचा कार्यक्रम केला होता. तो खूपच उपयुक्त वाटला.

**पुढील वर्षी यशस्वी उद्योजकांचे अनुभव ऐकण्याचा कार्यक्रम** आयोजित करण्याचा मानस आहे. कारण नुकतेच ५/२/२००० रोजी मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ मराठे यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ उद्योजकांचे मनोगत व्यक्त करण्याचा कार्यक्रम ठरवला आहे. कारण तरुणांनी नोकरीत गुंतून न राहता उद्योग व्यवसायात पदार्पण करावे अशी सुरेशभाऊंची मनापासून इच्छा होती. त्या दृष्टीने ते अतिशय तळमळीने प्रयत्न करत होते. त्यांच्या इच्छापूर्तीचा अल्पसा प्रयत्न करून पाहणार आहे. ह्यासाठी पुणेकरांची साथ आवश्यक आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पुण्यातील **जे शून्यातून वर आलेले यशस्वी उद्योजक असतील त्यांनी तरुणांना प्रेरणा मिळण्यासाठी आपले अनुभव सांगावे अशी इच्छा** आहे. त्यामुळे आपण स्वतः किंवा प्रतिष्ठान मधील आपल्याला माहीत असणारे जे पुणेकर उद्योजक असतील त्यांचे नाव पत्ता व फोन नंबर आम्हाला कळवावे अशी कळकळीची विनंती करत आहे.

***



Marathe Pratishthan

# ज्ञाननगरी - पुण्यनगरी

**माधव वासुदेव** (पृ. ३८६), पुणे.

महाराष्ट्राची सांस्कृतिक, शैक्षणिक राजधानी म्हणून पुणे शहर भारत देशात अनेक वर्षापासून प्रसिध्द आहे. इतिहासात सातवाहन काळात ख्रिस्तपूर्व ७ ते ९ शतक - पुण्यक/पूनक किंवा पुणकवाडी असा उल्लेख सापडतो. सातवाहनानंतर अनेक शतके यादवांची सत्ता होती. १४ व्या शतकापासून मुसलमानी राज्याचा अम्मल सुरू झाला. १५९५ च्या सुमारास निजामाने पुणे, जुन्नर, सुपे या भागाची जहागिरी शहाजी राजे यांचेकडे सोपवली. शहाजीराजे नेहमी लढायांसाठी स्वाऱ्यांवर जात असत पण जिजाऊ राणी साहेबांचा मुक्काम शिवनेरीवर कायम असे व त्या नेहमी पुणकवाडी पुण्यास येत असत. राणीसाहेबांच्या आगमनामुळेच पुणे शहराची पायाभरणी झाली.

४५० वर्षांपेक्षा पूर्वीचे पार्वतीनंदन गणेशाच्या मंदिरात जिजाऊ राणी साहेब नेहमी दर्शनास येत असत. हेच पुण्यातील सर्वात जुने गणेशमंदिर. खिडीतील गणपती म्हणून ते प्रसिध्द होते. चतुश्रृंगी देवीच्या टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या या मंदिरातील पुजाऱ्यांना झालेल्या दृष्टांतानंतर त्यांनी कसबापेठेतील एका विहरीतून गणेशमूर्ती बाहेर काढली. जिजाऊ राणीसाहेबांना हे सर्व समजल्यावर त्यांनी या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. तोच गणपती कसबा गणपती म्हणून प्रसिध्द झाला. या मंदिराजवळ जिजाऊ राणीसाहेब व बालराजे शिवाजी लालमहालात राहू लागले व पुण्याच्या वाढीस सुरवात झाली.

कसबा गणपतीच्या सानिध्यात बाळराजांवर जिजाऊ राणीसाहेब व दादोजी कोंडदेव यांनी उदात्त संस्कार घडवून आणले, परकीयांच्या पाशातून मातृभूमी स्वतंत्र करण्याचे शिक्षण याच पुण्यभूमीत बालराजांना गणेशाच्या साक्षीने मिळाले व मराठ्यांचे राज्य उदयास आले. मराठ्यांची राजधानी रायगडावर जाईपर्यंत पुण्यास खूपच महत्व होते. शिवाजी राजांच्या काळातच या पुण्यभूमीस ज्ञाननगरीचे महत्व आले.

पुणे परिसरातच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आळंदीस राहत असत. आपल्या अमोघ वाणीने व अतुलनीय ज्ञानाने त्यांनी सर्वांना जिंकून घेतले होते. आळंदी येथेच त्यांनी समाधी घेतल्याने अनेक ज्ञानेच्छू नेहमी आळंदी व पुण्यास यादव काळापासून येत आहेत. दुसरे महान संत तुकाराम महाराज यांचेही वास्तव्य पुण्याजवळील देहू येथेच होते. त्यांचे अभंग प्रत्येक मराठी माणसाच्या जिभेवर गेली चार शतके आहेत. या दोन संताच्या पदस्पर्शाने, अमोघ वाणीने व उत्तुंग ज्ञानाने पुणे शहराचे रूपांतर ज्ञाननगरीत झाले.

ज्ञानाचा अधिपती गणपती हेच पुणेकरांचे दैवत. गणेशाला पुणेकरांच्या मनात खूपच मानाचे व प्रेमाचे स्थान आहे व म्हणूनच गणेश पूजन व उत्सव पुण्यनगरीत दिमाखात केला जातो. पुण्यात गणपतीची अनेक मंदिरे असली तरी कसबा गणपतीला प्रथम मान दिला जातो. बहुतेक ब्राह्मण कुटुंबे मंगलकार्याची अक्षत प्रथम कसबा गणपतीपुढे ठेवतात. त्याचप्रमाणे विवाहानंतर जोडप्याने व मुंजीनंतर बटु प्रथम कसबा गणपतीलाच वंदन करण्यास येतात. ही परंपरा फार जुनी आहे. गणपती दर्शनानंतर जोगेश्वरी त्यात सुध्दा तांबड्या जोगेश्वरीचे दर्शन घेऊन मगच घरी जातात. जोगेश्वरी म्हणचेच आंबेजोगाईची जोगेश्वरी जी अनेक ब्राह्मण कुटुंबियांची कुलदेवता आहे. पुण्यात जोगेश्वरीची तीन मंदिरे आहेत. तांबडी जोगेश्वरी, काळी जोगेश्वरी व पिवळी जोगेश्वरी.

छत्रपती शिवाजी राजे रायगडला गेल्यानंतर काही काळ पुण्याचे महत्व कमी झाले. पण पेशवे पुण्यात आल्या नंतर पुण्याचे महत्व वाढू लागले. पहिल्या बाजीरावांनी संपूर्ण भारतात आपले राज्य पसरवले तेव्हा पुण्याची कीर्तीही सर्वत्र झाली ती अद्यापही आहे. पेशव्यांच्या काळातच पुण्याची पध्दतशीर वाढ झाली व अनेक सुधारणाही झाल्या.. अनेक कोकणस्थ याच काळात पुण्यात येऊन स्थायिक झाले. आता मात्र परप्रांतातील अनेक भाषी लोक पुण्यात येऊन स्थायिक होत आहेत. याचेकारण येथील चांगली हवा, भरपूर पाणी, व सर्वतऱ्हेच्या शैक्षणिक सुविधा.

पेशव्यांची गणेशावर फार भक्ती. त्यामुळे पुण्यात अनेक गणेश मंदिरे स्थापन झाली. मोदी गणपती, मातीचा गणपती, त्रिशूंड गणपती, गुंडाचा गणपती, दशभुजा गणपती, सारसबागेतील सिध्दीविनायक वगैरे. सारसबागेतील सिध्दीविनायक हा पूर्वी तळ्यातील गणपती म्हणून प्रसिध्द होता. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी या गणेशाची स्थापना केली. छोट्या टेकडीवर मंदिर बांधले व टेकडीच्या भोवती असलेले तळे मोठें व खोल खणून नानासाहेबांनी तेथे नौकाविहाराची सोय केली होती. सुमारे पंचवीस वर्षापूर्वी पुणे महापालिकेने येथील तळे बुजवून तेथे बाग केली.

पेशव्यांच्या काळात गणपती उत्सवास भव्य स्वरूप येऊ लागले. सवाईमाधवराव यांच्या आमदानीत गणपती उत्सव शनिवारवाड्यातील गणेश महालात खूपच भव्य प्रमाणात होत असे. त्या वेळेस हा उत्सव सहा दिवस चाले. शनिवार वाड्यातील उत्सवाने प्रेरित होऊन पुणे शहरात पटवर्धन, दिक्षीत, मुजूमदार वगैरे काही सरदारांनी आपआपल्या वाड्यात गणेश उत्सव सुरू केले.

खाजगी रितीने सुरू असलेल्या या गणेश उत्सवास १८९३ साली नानासाहेब खाजगीवाले यांनी सार्वजनिक स्वरूप दिले. प्रथम तीन सार्वजनिक गणेश उत्सव साजरे झाले. रस्त्यातून गणपती मिरवत नेण्याची पध्दत पण तेव्हाच सुरू झाली. १८९४ साली पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागात सार्वजनिक गणपतींची स्थापना झाली. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला अभिनव सार्वजनिक स्वरूप देऊन स्वतः विंचूरकर यांच्या वाड्यात गणपती बसवला हा उत्सव दहा दिवस चालवण्याची प्रथा सुरू केली. गणेश उत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्यात लोकमान्यांचा हेतू असा होता की या योगाने हिंदू समाज संघटित व्हावा व स्वातंत्र्याच्या चळवळीस अधिक जोम प्राप्त व्हावा. पुणे शहरातील हा गणेश उत्सव महाराष्ट्रातील सर्व गावागावात, भारतात व परदेशातही थोड्याच काळात पसरला.

समाजाच्या ज्ञानात मोलाची भर पडावी या दृष्टीने सुरवातीस गणपती उत्सवात व्याख्याने, कीर्तने, नाटके होत असत. हळूहळू मेळयांना सुरवात झाली व नंतर करमणुकीचे कार्यक्रम व

Marathe Pratishthan

गाण्याच्या जलशात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आता तर या उत्सवातून ज्ञान, समाज प्रबोधन दर्जेदार संगीत या गोष्टी मागे पडून केवळ भव्य देखावे, भव्य मूर्ती व विद्युतरोषणाई, थाटमाट यांनाच प्राधान्य मिळू लागले आहे.

काही निवडक गणेश मंडळे आपल्याकडे जमलेल्या लाखो रुपयांचा निधी समाज उपयोगी कार्य करण्यासाठी खर्च करतात. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेश उत्सव समितीचे कार्य वाखाणण्यासारखे आहे.

विद्येचा अधिपती गणपती याचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करणाऱ्या पुणे शहरात ज्ञान गंगाही मोठ्या प्रमाणात वाहत आहे. अनेक तऱ्हेच्या शैक्षणिक सुविधा पुणे शहरात उपलब्ध आहेत. पुणे शहर परिसरात सुमारे एक लाख पंचवीस हजार विद्यार्थी ९२७ महाविद्यालयातून शिक्षण घेत आहेत. इंजिनिअरिंग महाविद्यालय तर १८५४ पासून सुरू आहे. पुणे विद्यापीठाप्रमाणेच भारती विद्यापीठ व कर्वे स्त्री शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत.

संशोधन कार्यात पण पुणे शहरात अनेक संस्था नावारूपास आल्या आहेत. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, राष्ट्रीय संरक्षण प्रभोदिनी, बालचित्र वाणी, भांडारकर संशोधन संस्था, आयुका, वसंतदादा साखर संशोधन संस्था, आगरकर संशोधन, संस्था फिल्म व टी.व्ही. शिक्षण संस्था या सारख्या अनेक संस्था पुण्यात आहेत. स्त्रियांच्या शिक्षणाला चालना देणारी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था किंवा भारतीय सैन्यदलाला लागणाऱ्या शस्त्रास्त्रात नवनवीन सुधारणा करणारी, संशोधन करणारी भारतातील एकमेव संशोधन संस्था पुण्यातच आहे.

नव्या युगाच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातही पुणे शहर आघाडीवर आहे. संगणक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था तर पुण्यात आहेतच पण सी-डॅक सारखी संगणक क्षेत्रात नवनवीन संशोधन करणारी संस्थाही पुण्याचीच. याच संस्थेने अमेरिकेने भारताला नाकारलेला परम महासंगणक पुण्यात तयार करून सर्व जगात मान मिळवला इतकेच नव्हे तर असा हा महासंगणक रशियाला सुध्दा दिला व आता इतर देशांनीही मागितला आहे. वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगतीचा आलेख नुकत्याच झालेल्या सायन्स काँग्रेसमध्ये पाहण्यात आला. यातील सर्वासाठी खुल्या असलेल्या प्रदर्शनास लाखो पुणेकरांनी भेट देऊन आपली ज्ञानलालसा प्रगट केली.

आधुनिक संगणकाचा उपयोग केवळ व्यापार उद्योग किंवा अर्थ व मनोरंजन यासाठीच नसून भारताचा जो अमूल्य ठेवा अध्यात्म यासाठीही पुणे परिसरात करून घेऊन एक नवा अध्याय भारतीय सांस्कृतीत उघडण्यात आला आहे. आळंदी येथे ६० फूट उंचीच्या पडद्यावर संगणकाच्या सहाय्याने ज्ञानराजांची ज्ञानेश्वरी आता इंद्रायणी काठी प्रगट झाली आहे. 'पुणे तिथे काय उणे' असे म्हणतात. ज्ञान व सांस्कृतिक क्षेत्रात इथे काहीच उणे नाही - म्हणूनच या नगरीला पुण्य नगरी - ज्ञान नगरी म्हणायचे!

***

## वरुण

- **स्वाती गजानन अभ्यंकर** (विजय अनंत, पृ. १५५, यांची मुलगी) चिंचवड, पुणे.

निळ्या सुंदर आकाशात
थोडस मळभ दिसू लागल
वरूण आता प्रसन्न होणार
हे जाणवून मन आनंदून गेल

गरम अशा मृत्तिकेवर
पाण्याचा तो पहिला थेंब
शहारून उठली धरती
आले पहा नवीन कोंब

पावसाची येणारी प्रत्येक सर
रेशमाच्या लडी सारखी वाटू लागली
वृक्षांना फुटलेली नवीन पालवी
गालात हळूच हसू लागली

एका मागून एक पानांचे
झुपके तरूवर दिसू लागले
आणि धरणीवर जणू पाचूंचे
झुंबरच सुरेख डोलू लागले

## सुखाचा शोध

**मीननाथ लक्ष्मण** (पृ. २८०) पुणे

मनुष्य त्याच्या मूळ स्वभावधर्मामुळे सतत सुखाच्या म्हणजेच आनंदाच्या प्राप्तीचा प्रयत्न करत तो प्रथमतः अनेक आकर्षक, मोहक गोष्टींच्या सान्निध्यात जातो. मग त्याला त्यांची ओढ लागले व पुढे त्या ओढीचे रूपांतर आसक्ती मधे होते. ती आसक्ती त्याला नको त्या गोष्टीसुध्दा करायला भाग पाडते आणि तो त्या चक्रात अडकून पडतो.

तीव्र आसक्ती क्रोध, लोभ, मत्सरादिक विकार निर्माण करते. ज्यामुळे मनःशांति, आनंद प्राप्ती दुर्मिळ होतात. आपल्या संसारी जीवनातसुध्दा व्यक्ती, वस्तु, धन यांची तीव्र आसक्ती धरू नये. स्वतःचे प्राप्त कर्तव्य करत नीतीधर्माने अर्थार्जन करावे. स्वतःस योग्य, प्रिय विषयांचा मर्यादित उपभोग घ्यावा. आप्त, स्नेही, परिचित सर्वावर प्रेम करावे. जेवढे शक्य असेल तेवढे सर्वांना साह्य करावे. स्वतः बरोबर सर्वांच्या सुखाची, कल्याणाची इच्छा धरावी. ज्या परमेश्वराने नरदेह दिला, पृथ्वीवरील निसर्ग व अनेक सुंदर अनुभव दिले त्याचे उपकार स्मरून दिवसाकाठी काही वेळ त्याचे चिंतन, स्मरण करून कृतज्ञता व्यक्त करावी तेव्हांच त्या आनंदाचा शोध संपेल. तो आपल्या अंतरातच आहे याची जाणीव होईल व जीवन धन्य होईल. समर्थ सांगतात काया वाचा आणि मने। पत्रे पुष्पे फळे जीवने। ईश्वरी अर्पूनिया मने। सार्थक करावे।। यथानुशक्ती दानपुण्य। परी भगवंती अनन्य। सुखदुःखे परी चिंतन देवाचेच करावे।। आदिअंती एक देव। मध्येचि लावली भाव। म्हणोनिया पूर्ण भाव। भगवंती असावा।। शरीर लावावे कारणी। साक्षेप उठे अंतःकरणी। सत्वगुणांची करणी। ऐसी असे। शांति क्षमा आणि दया निश्चय उपजे जया। तो सत्वगुण।। परपीडेचे वाहे दुःख। परसंतोषाचे सुख। वैराग्य देखोनि हरिख। मानी तो सत्वगुण।। परभूषणे भूषण। परदूषणे दूषण। परदुःखे सिणे जाण। तो सत्वगुण।। सन्मार्ग दाखवी जना। जो लावी हरिभजना ज्ञान सिकवी अज्ञाना। तो सत्वगुण।। आचरता सत्वगुण निश्चित लाभे सुखानंद।

***



Marathe Pratishthan

वर्धापनदिन पुणे पुरवणी

# तारेवरची कसरत - एका तुरुंगाधिकाऱ्याची!

**अच्युत महादेव चक्रदेव** (पृ. ७३२) निवृत्त कारागृह अधीक्षक पुणे.

''साहेब, चला लवकर, तो किशा, बेहोश झालाय, त्याच्या तोंडातून खूपच फेस बाहेर पडतोय. किशाला बाहेरच्या रूग्णालयात पाठवायला पाहिजे.''

नव्याने भरती झालेला रक्षक कांबळे मला सांगत होता. मी टोपी घातली, हातात काठी घेतली आणि पळतच कारागृहातल्या रूग्णालयात गेलो. समोर पाहिलं, किशा जमिनीवर अस्ताव्यस्त पडला होता. तांडातून फेस बाहेर येत होता. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून मी तात्काळ कारागृहाच्या डॉक्टरांना बोलावून घेतले. कारागृहाचे डॉक्टर आले, त्यांनी किशाकडे पाहिलं आणि पटकन त्यांचा चेहरा समोर वळवून त्याच्या तोंडातून एक साबणाची छोटी वडी बाहेर काढली! तो फेस साबणाचा होता, आणि कारागृहातील कामे टाकून बाहेरील रूग्णालयात दाखल होण्यासाठी केलेले किशाचे ते नाटक होते, हे मला समजले.

अधिकारी या नात्याने माझा सुरवातीचा काळ मुंबईतील कारागृहात गेल्यामुळे मला बरंच काही पहायला, शिकायला मिळाल व त्याचा उपयोग पुढील सेवाकाळात करता आला. त्या काळात मला माझे वरिष्ठ अधिकारी सुध्दा उत्कृष्ठ मार्गदर्शन करणारे भेटले. अन्यथा तुरूंग अधिकाऱ्याची नोकरी म्हणजे निव्वळ तारेवरची कसरत समोर कितीही कटु, कठोर प्रसंग उभा ठाकला तरी मनाची चलबिचल होवू द्यायची नाही, भावनाप्रधानही व्हायचे नाही, शांत मन ठेवून निर्णय घ्यायचा अशी शिकवण आम्हाला दिली गेली होती.

कारागृहातील न्यायाधीन बंदींना घरचे अन्न त्यांच्या अर्जानुसार देता येते. पण ते डबे तपासावे लागतात. डबा आणणाऱ्या व्यक्तीला त्या जेवणाची थोडी चव घ्यायला लावायची, डबा नीट तपासायचा आणि मग तो बंदीला द्यायचा. असाच एकदा डबा तपासताना बंदी फारच घाई करू लागला. 'मला भूक लागलीय म्हणू लागला, शिवीगाळ करू लागला' तेव्हा मला संशय आला आणि मी डब्यांतील भात ताटांत ओतला पाहिल तर आत मोठी चरसाची पुडी भाताखाली दडवलेली. अर्थात त्याचा डबा नियमानुसार कायमचा बंद झाला.

मुंबईचा एक प्रसंग मला खूप वेळा आठवतो. काही कायदेशीर सवलती मिळायला उशील झाला म्हणून त्यावेळी गाजलेला एक गुन्हेगार संध्याकाळी बराकीत बंद होत नव्हता. एवढेच नव्हे तर तो एवढा संतापला होता की, हातात एक मोठा दगड घेवून तो फाटकांतच उभा होता व धमकावत होता. त्यामुळे त्याला बंद करायला कोणी धजत नव्हते! तसे जाता येता तो मला सलाम करीत असे, म्हणजे माझ्याबद्दल त्याचे मनांत राग नव्हता हे मी ओळखले व त्या भांडवलावर मी त्याचेकडे जावू लागलो, तो ओरडू लागला, ''चक्रदेव साब, आप आगे मत आना, दगड मारुंगा.'' माय मी जसजसा पुढे होत होतो तसतसा एक एक पाऊल मागे सरकत होता. मी निश्चित ओळखल की हा नुसताच दमबाजी करतो आहे, आणि मी पुढे जावून त्याचे हातातील दगड काढून घेतला, त्याला समजावले व बरकीमध्ये बंद केले. जाता येता त्याच्या मनात दिसणाऱ्या माझ्याबद्दलच्या सद्भावनांनी हे काम केले. त्याच्यावर काही प्रकारची जबाबदारी टाकल्यावर तो सुटेपर्यंत खूपच सुधारला.

मुंबईचीच एक गोष्ट, संध्याकाळी न्यायालयातून आणलेली बंद्यांची एक तुकडी मुख्य प्रवेशद्वारांत जोडी-जोडीने बसवली होती. मी बंदीना प्रवेश देण्याचे काम करीत होतो. एक बंदी सारखा वेडेवाकडे बोलून, शिवीगाळ करीत, इतर बंदींवर छाप पाडत, माझे कामात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करीत होता. मी नवीन होतो हे त्याने ओळखले होते. मी एक-दोनदा समजावून सांगितले पण ते त्याने थट्टेवारी नेले. मग मात्र मी संतापून त्याला हातकड्या चढवल्या व रक्षकांना त्याला अलग कोठडीत बंद करण्यास सांगितले. जाताना तो ओरडत होता, ''साब आप जेल मे राज जरूर करेंगे लेकिन हमारे मुहल्लेमे आना. हम उधर आपको देखेंगे'' तो सुटल्यावर एका रविवारी मी आणि माझा एक मित्र त्याला आव्हान दिल्यासारखे त्याच्या मुहल्यात घुसलो. तरूण पणांतील रग आणि खुमखुमी स्वस्थ बसू देत नव्हती. त्याला गाठले व वरील प्रसंगाची आठवण दिली. तो चकित झाला व पाया पडून म्हणाला, ''साहेब, आम्ही तर नेहेमीच जेलमधे येणार, तुमचेशी आमचे काहीच भांडण नाही माझ्या त्यावेळच्या बोलण्यावर जावू नका.'' त्याच्याशी मग काही गप्पा मारून त्याला चांगला मार्ग अनुसरण्याची समज देवून आम्ही परतलो.

काही अतिशय भावनाप्रधान बंदी असतात. येरवड्याला असाच एक बंदी भेटला. अतिशय कामसू. दिवसभर तो खूप काम करायचा. स्वतःचे नेमलेले काम करून तो त्याचा सर्व विभाग अगदी स्वच्छ ठेवायचा, शेणाने जमिनी सारवायचा. पण बोलताना कधी दिसायचा नाही. त्याला इतर बंदी ''मुक्या'' म्हणत. तो इतरांशी बोलताना फक्त खुणा करी.

त्यावेळी बंदीचे सांस्कृतिक कार्यक्रमांची जबाबदारी माझेवर होती. कलावंत बंदींना मी कार्यक्रमासाठी आवाहन केले. त्यावेळी तबलावादनात ''मुक्याचे'' नाव पाहून मी चकित झालो. मुका हा बहिराही असतो. मग हा तबला कसा वाजवितो? ऐकू येत नाही तर साथ कसा करतो हा मला प्रश्न पडला. मी त्या वॉर्डरकडे चौकशी केली. त्याने जे सांगितले त्यामुळे मी थक्क झालो. त्याने सांगितले मुक्याच्या हातून क्षणिक संतापाच्या भरात अजाणता त्याच्या आईचाच खून झाला होता आणि त्या बाबत त्याला ही शिक्षा झाली होती. मुक्याला खूपच पश्चाताप झाला व त्या भरात त्याने ठरवून टाकले की आता तुरूंगातून सुटेपर्यंत तोंडातून शब्द काढायचा नाही. तो संकल्प तो मोठ्या कसोशीने पाळत होता. हे कळल्यावर मी मुक्याला बोलावून घेऊन सांगितले की तू प्रतिज्ञा केलीस ते ठीकच आहे परंतु रोज स्वतःशी तरी कोपऱ्यात जाऊन थोडे अभंग, गाणी, गुणगुणत जा. नाहीतर स्वरयंत्र खराब होईल. तबला वाजवला नाही तर काय होईल? वाद्य वाजवले गेले पाहिजे तरच त्याची सार्थकता. तो खूप गंभीर झाला व त्याने मला प्रतिसाद दिला.

Marathe Pratishthan

बंद्यांची मानसिक अवस्था पाहून त्या दृष्टीने त्यांना वागणूक द्यावी लागते. शिक्षा झालेल्या बंदीला महिन्यातून एक वेळा व न्यायाधीन बंदींना आठवड्यातून एक वेळा घरच्या माणसांची भेट घेता येते. मुन्नाच नाव मुलाखतीमध्ये पाहून आश्चर्य वाटलं. कारण गेल्या काही वर्षात मुन्नाला कोणाचीही भेट, मुलाखत आली नव्हती. तसेच त्याने कोणाला पत्रही पाठवले नव्हते. मी त्याला बोलावले आणि त्याला म्हणालो, ''मुन्ना, तुझी ही इतक्या वर्षातुन पहिलीच भेट आहे, पाहिजे तितके बोल तुझ्या माणसांशी.'' मुन्नाचे मोठे भाऊ, भावजयी, बहिणी, वृध्द आई, दोन तीन लहान मुले एवढा परिवार भेटीला आला होता. एकमेकांची भेट होताच कोणालाच रडू आवरेना. शेवटी मीच सांगितले की, ''वेळ वाया जाऊ देऊ नका बोलायला सुरवात करा.'' मग संभाषण सुरू झालं. भाऊ म्हणाला, ''अरे तू नेमका कुठे आहेस आम्हाला काहीच माहिती नव्हतं. आम्ही खूप तपास केला, आम्हाला नाईलाजाने परदेशी जावं लागल.'' यावर मुन्ना कमालीचा संतापला. समोरच्या सगळ्या नातेवाईकांना मोठमोठ्याने त्याने शिव्या द्यायला सुरवात केली. ''साहेब'', माझ्याकडे बघून तो ओरडला, ''या सगळ्यांना हाकलून द्या. मला ही भेट नको. यांनी वृत्तपत्रांत जाहिरात द्यायची होती. ती वाचून त्यांचे पत्यावर मी त्यांना कळविले असते.'' इत्यादी तो बडबडू लागला. जाळी पलीकडील त्याची माणस अवाक् झाली होती. मी खुणेने त्यांना थांबायला सांगितले. मुन्नाला म्हटलं, ''मुन्ना, त्यांची चूक झाली, पण तू खात्यामार्फत वृत्त पत्रांतून नातेवाईकांना आवाहन करू शकला असतास, पण तू सुध्दा ते केले नाहीस. त्यावर मुन्ना थोडा विचार करून म्हणाला 'साहेब, माझी चूक झाली. माफ करा!'' मी म्हटलं, माझी नको तुझ्या घरच्यांची क्षमा माग... आणि ती भेट पुन्हा आनंदाने सुरू झाली.''

मृत्युदंड झालेल्या बंदीच जग निराळच असतं. शाळेत जाणाऱ्या मुलीचे गळ्यांतील सोन्याचं लॉकेट बीरूने हिसका मारून घेतले आणि ती ओरडू नये म्हणून त्याने तिचा गळा दाबला. आधीच प्रचंड घाबरलेली ती मुलगी गळा दाबला जाताच काही क्षणांतच दगावली. बीरू पळून गेला. पण दुसऱ्याच एका प्रकरणात तो काही महिन्यांनी सापडला व त्याचे वरील प्रकरणही उजेडात येवून त्यात त्याला मृत्युदंडाची शिक्षा झाली. यथावकाश त्याच्या सर्व याचिका फेटाळल्या गेल्या. तो तुरूंगामधील कोठडीत आला. तुरूंग अधिकाऱ्याला, रक्षकांना तो नेहमीच शिवीगाळ करी. अन्न, कपडे फेकून देई. या ना त्या मार्गाने सारख्या अडचणी निर्माण करणे हेच त्याचे जणू काही काम होते. याच सुमारास लोणावळ्याचे न्युवे आश्रमचे संचालक कै. स्वामी विज्ञानानंद बंदींचा मानसिक अभ्यास करण्याच्या दृष्टीने शासनाचे परवानगीने कारागृहात येवू लागले. त्यांनी चौकशी केली, ''तुमचं ऐकत नाही सहकार्य करीत नाही. असा एखादा बंदी आहे का?'' मी त्यांना बीरूचे नाव सांगितले. त्यानंतर स्वामी विज्ञानानंद सातत्याने येऊन त्याला भेटत. समजावून सांगत पण सुरवातीला तो त्यांनाही दाद देत नसे. शिवीगाळ करी. स्वामींच्या बऱ्याच प्रयत्नांनंतर त्यांचे प्रयोगात यश येऊ लागले. आम्ही पहात होतो, अनुभवत होतो, बीरू आता खूपच शांत होत होता. आम्हाला नमस्कार करीत होता. केलेल्या दुर्वर्तनाबद्दल माफी मागत होता.

अचानक त्याच्या फांशीची तारीख आली. त्याला आधीचे दिवशी विशिष्ट कोठडीत बंद केले. स्वा. विज्ञानानंद संध्याकाळी त्याला भेटून गेले ते म्हणाले, ''बाबारे, तुला आता पश्चाताप झाला आहे. चांगली गोष्ट आहे. तुझ्या गैरकृत्याबाबत उद्या तुला फाशी देतील घाबरू नको. आपण देवाच्या हातातील कळसूत्री बाहुली आहोत. तो नाचवेल तसं नाचायचं! उद्या फाशीच्या दोऱ्या ह्या तुझ्या पुढच्या जन्माच्या पाळण्याच्या दोऱ्या समज. मी तुला फाशी पूर्वी पहाटे भेटायला येईन.'' असे सांगून ते निघून गेले. मीही रात्रभर बंदीच्या विभागात नेमणूक घेतली. फाशी जाणाऱ्या बंदीचे कोठडीपुढे मी रात्रभर खुर्चीत बसून होतो, कधी फेऱ्या मारत होतो. मला निरीक्षण करायचे होते. बंदी नेहमीसारखाच शांत झोपला होता. सकाळी ४॥ ला तो उठला. त्याने आंघोळ केली. शंकराची, तुळशीची पूजा केली व तो बसला. पुटपुटु लागला. मधूनच तो नमस्कार करी. ठरल्याप्रमाणे स्वामी विज्ञानानंद आले. ते म्हणाले, ''बाबारे, मी आता पवित्र ओंकार सुरू करतो काळजी करू नकोस. धीर धर. सर्वांची मनःपूर्वक क्षमा माग.'' सांगून त्यांनी ओंकार सुरू केला. प्रथम हळू आवाजात व मग आवाज वाढवत त्यांनी ओंकार केला. असा ओंकार मी कधी ऐकला नव्हता. ओंकारांतून निघणारी स्पंदनं मलाही स्पर्शून जात होती. स्वराची होणारी पवित्र कंपनं मला जाणवत होती. पहाटेच्या नीरव शांततेतला व गूढ गंभीर वातावरणातला तो ओंकार विलक्षण अनुभव देत होता. तो मी कधीच विसरणार नाही.

यथावकाश तुरुंगाच्या नियमानुसार पध्दतीप्रमाणे बंदीला फाशी दिली गेली. फाशी दिल्यावर पुन्हा बंदी समोर लांब अंतरावर स्वामी विज्ञानंद येवून ध्यानांत बसले व काही वेळाने उठले. मी म्हटले, ''तुम्ही कसले ध्यान केलेन?'' ते उत्तरले बंदीच्या आत्म्याशी मी बोलायचे कबूल केले होते. त्याप्रमाणे मी बोललो. आता मी जातो आणि ते निघून गेले........

कारागृह हे जगच निराळे आहे. अनेक चित्तथरारक, विदारक, आनंददायक अनुभव कारागृहाचे प्रदीर्घ सेवाकाळांत मला आले. त्यातील काही वरील प्रमाणे दिले आहेत. स्थलसंकोचास्तव हे कथन-लेखन थांबवतो. धन्यवाद! ***

---

हसरे हितगुज

### 'क्वार्टर' घेऊन भाषांतर

- गजानन भास्कर (पृ.४२७), घाटकोपर

मुंबई महानगरपालिकेत चाळीस वर्षापूर्वी "Tenders are invited for painting Nurses Quarter" ह्याचे मराठी जाहिरातीत ''परिचारिकांचा एक चतुर्थांश भाग रंगविण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत.'' असे भाषांतर केले होते. कै. आप्पा पेंडसे, हे हुशार व मिष्किल नगरसेवक होते. त्यांनी महापालिकेच्या सभेत जाहिरात वाचून दाखवून हरकतीचा मुद्दा काढून कमिशनरांना प्रश्न विचारला. ''परिचारिकांच्या रंगरंगोटीची व्यवस्था महापालिका केव्हापासून पाहू लागली?'' कमिशनरनी माफी मागून खुलासा केला - ''जाहिरात मराठीत पाठविण्याचे उशिरा ठरले. त्यामुळे घाईघाईत भाषांतर करण्यांत आले. ज्याने भाषांतर केले, त्यास मराठी नीट येत नव्हते. यापुढे काळजी घेतली जाईल व प्रत्येक खात्यांत मराठी विभाग स्थापन करण्यात येईल.''

महापौर गंमतीत म्हणाले, ''भाषांतरकर्त्याने 'क्वारटर' घेऊन भाषांतर केले असेल.''



Marathe Pratishthan

# विवेकानंद केंद्र - त्याग व सेवेचे प्रतीक

**सौ. अरुणा अरविंद** (पृ. ३१८) चिंचवड, पुणे.

स्वामी विवेकानंद यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १९६१ साली विवेकानंद शिला स्मारक समिती तयार झाली व ज्या शिलेवर स्वामीजींना सत्याचा साक्षात्कार झाला त्या शिलेवर स्वामीजींचे स्मारक उभे करण्याचा विचार निश्चित झाला. श्रीपाद शिलेवर भव्य असे स्मारक उभे राहिले. २ सप्टेंबर १९७० या शुभदिनी राष्ट्रपति गिरी यांनी या स्मारकाचे उद्घाटन केले.

या प्रेरणादायी शिला स्मारकाचे कृतिशील रूप म्हणजे विवेकानंद केंद्र. त्याग व सेवा या तत्त्वावर आधारलेले हे एक सेवा संगठन आहे. केंद्र मुख्यतः योग, शिक्षण, प्रकाशन, ग्रामविकास या चार विभागांत काम करते.

**योग** ही एक आदर्श जीवन प्रणाली आहे व योगाद्वारे आपण आपले जीवन निरामय व शांततेत, समाधानांत घालवू शकतो. लहान मुलांना लहानपणापासून सूर्यनमस्कार व योगासने शिकविली जातात. तसेच प्राणायाम वर्ग घेतले जातात. बंगलोर येथे योगाद्वारे विविध जुनाट रोगावर उपचार केले जातात. तसेच या विषयाचे संशोधनहि केले जाते.

**शिक्षण** ही माणसाची मूलभूत गरज आहे व त्यादृष्टीने कन्याकुमारी येथे १६ शाळा चालवल्या जातात. अरुणाचल सारख्या दुर्गम प्रदेशांत आदीवासींसाठी १४ निवासी शाळा चालवल्या जातात. तसेच अनेक प्रलोभने दाखवून अरुणाचल येथे प्रचंड धर्मांतर होत आहे. त्याला आळा घालून हिंदू संस्कृति जीवित ठेवणे हेहि महत्वाचे कार्य केले जाते.

**प्रकाशन** केंद्राद्वारे विविध पुस्तके, मासिके, चौमासिके वगैरेचे प्रकाशन होते. यामधे विविध माहितीपूर्ण व संशोधनात्मक लेख असतात. त्यामुळे केंद्र कार्य लोकांपर्यंत पोचवता येते. सार्वजनिक कार्यक्रमाचे ठिकाणी रामकृष्ण, विवेकानंद साहित्य विक्री केली जाते.

**ग्राम विकासाच्या विविध योजनांद्वारे** खेड्यातील जनतेला सुधारण्याचे कार्य केले जाते. भारत हे राष्ट्र मुख्यतः खेड्यांचे बनले आहे. खेड्यातील जनता अशिक्षित, अडाणी आहे. त्यांना विकासाची माध्यमे खुली करून दिली जातात. शेतीची नवीन तंत्रज्ञान। स्वस्त घरे बांधणे, गोबर गॅस प्लॅट तयार करणे वगैरेची माहिती दिली जाते. तसेच स्वच्छतेचे महत्व सांगून आरोग्या विषयीचे ज्ञान दिले जाते. अरुणाचल प्रदेशात भारत सरकारने अजूनहि दळणवळणाच्या सोई केलेल्या नाहीत. अशा दुर्गम भागात जाऊन केंद्र कार्यकर्ते तेथील रहिवाशांना मदत करतात व स्वावलंबनाने राहण्याचे मार्ग दाखवतात. कारण येथे काही विदेशी शक्तींचे प्राबल्य वाढले आहे, त्यां लोकांना मोफत शस्त्रास्त्रे देऊन त्यांना गुंडगिरीकडे प्रवृत्त करण्याचे कार्य काही विदेशी करत आहेत.

हे सर्व कार्य उभे करण्यासाठी निस्वार्थी, राष्ट्रप्रेमी कर्तव्य दक्ष कार्यकर्त्यांची आवश्यकता असते. त्यासाठी **जीवनव्रती योजना** आखली आहे. पूर्णपणे सेवाभावाने काम करण्याची इच्छा असलेल्या पदवीधरांना प्रशिक्षित करून देशातील विविध भागांत कार्य करण्यासाठी पाठवले जाते. जीवनव्रतींचा खर्च केंद्रातून केला जातो. हे जीवनव्रती 'मानव सेवा हीच माधव सेवा' या तत्वाने जन्मभर कार्य करतात. जीवनव्रतींची नियुक्ती अनेक चाचण्या घेऊनच केली जाते.

ज्यांना संपूर्ण जीवन देणे अशक्य असते त्यांना १ किंवा २ वर्षे या कार्यासाठी देता येतात. त्यांना **सेवाव्रती** म्हणतात. स्वार्थाने व राजकारणी हेतूने कार्य करणारे खूप आहेत. त्यांचे पितळ काही दिवसातच उघडे पडते. पण केंद्र कार्याला जीवन वाहून घेणारे जीवनव्रती त्याग व सेवा या मार्गाने काम करताना पाहिले की मनोमन वाटते की या देशाला चांगले दिवस निश्चित येतील. यासाठी केंद्र कार्य सर्वदूर पोचवायला हवे. सर्व भारतवासीयांना या कार्याचे महत्व पटवायला हवे.

केंद्राच्या शाखा भारतभर पसरल्या आहेत. कै. बापूसाहेब मराठे हे पुणे विवेकानंद केंद्राचे ४-५ वर्षे अध्यक्ष होते. चिंचवडलाहि विवेकानंद केंद्राची शाखा गेली १५-१६ वर्षे काम करत आहे. केंद्रातर्फे समाजातील सर्व घटकांसाठी विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते. आंतर शालेय राष्ट्रभक्तीपर समूहगीत स्पर्धा दरवर्षी स्वातंत्र्य दिनाचे निमित्त घेतल्या जातात. तसेच योगासन वर्ग, प्राणायाम वर्ग या सर्वांचे आयोजन केले जाते. शालेय मुलांसाठी व कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबिर व ट्रेकिंग वगैरे कार्यक्रम होतात. विवेकानंद जयंतीच्या निमित्त युवक सप्ताह साजरा केला जातो.

अशा प्रकारे केंद्रकार्य सुरू आहे. या कार्यात कोणालाहि सहभागी होता येते व यथाशक्ती सेवेचा वाटा उचलता येतो. ज्यांना राष्ट्रासाठी काही काम करायची इच्छा असेल त्यांनी आपल्या भागातील केंद्रशाखेशी संपर्क साधावा. ***

# छोट्या मुलीच्या ताईचा खूपऽऽ खूऽऽप मोठा गौरव!

**सौ. मंजिरी मोहन** (पृ. ४९०), पुणे ३०.

मी नोकरी करायची नाही म्हणून मुंबईतला नवरासुध्दा बघितला नाही. मुंबईत रहायचे म्हणजे नोकरी करणं भागच आहे.

लग्न झाल्यावर थोडे दिवस खूप मजेत, आराम करण्यात गेले. पहिला मुलगा झाला. तोही हळूहळू मोठा होऊ लागला, आणि मग मात्र मला आरामाचा कंटाळा येऊ लागला. मला काहीतरी करावं, शिकावं, नोकरी करावी असे सारखे वाटू लागले.

मी मॉंटेसरीचा कोर्स केला. रिझल्ट लागला आणि लगेच नोकरी लागली ती सुध्दा चांगल्या नामांकित शाळेत. अहो, ही शिशुशालेची नोकरी म्हणजे पगार कमी पण ह्या छोट्या मुलांवर लक्ष ठेवणे, त्यांना घडवणे त्यांच्यावर संस्कार करणे ह्या सर्व जबाबदाऱ्या मात्र खूप असतात. पण ह्या नोकरीत सुरक्षितता वाटते. प्रायव्हेट मध्ये नोकरी करायची म्हणजे आपल्यावरचे अधिकारी कसे असतील ही काळजी खूप.

शाळेत लागल्यापासून मला रोजच वेगवेगळे अनुभव येत असतात. कधी चांगले कधी वाईट.



Marathe Pratishthan

मुलांना शिस्त लावायची म्हणजे थोडेसे तरी रागवावे हे लागणारच. काही पालक म्हणतात ती त्रास देते तिला खूप रागवा, मारासुध्दा. आणि काही पालकांना असं वाटतं आपल्या मुलीला कोणी रागावता कामा नये.

दोन, चार वर्षापूर्वीची गोष्ट. माझ्या वर्गात एक छोटीशी मुलगी आली. तिचे पोट खूप मोठे, म्हणजे आपण कल्पनाच करू शकणार नाही. बाकी शरीर बारीक. त्यामुळे ती खूप विचित्र दिसायची, काहीजण हसायचे. पण मला मात्र त्या मुलीचे नेहमीच वाईट वाटायचे. अस असण्यात त्या मुलीचा काय दोष?

पालकांना बोलावून विचारले, डॉक्टर तपासणी करण्यास सांगितले. नाना प्रकार झाले. डॉक्टरांनी सांगितले आपरेशन करायला लागेल, काय होईल ते मात्र आम्ही सांगू शकत नाही. त्यामध्ये ती वाचेल नाहीतर दगावेलसुध्दा. आईवडील अक्षरशः रडत हे मला सांगत होते. पण ते म्हणाले ऑपरेशन सहा-सात महिन्यांनी करूया. थोडे दिवस ती शाळेत आलीच नाही. पण तिला शाळेत येण्याची खूप इच्छा होती. मग आमच्या मोठ्या बाईंनी तिला आठवड्यात तीन दिवसच येऊ दे असे सांगितले. सगळ्या मुलीसुध्दा हसायच्या. तिच्याशी बोलायच्या नाहीत. मी मात्र रोज मुलींना तिच्याशी बोलायला लावायचे तिच्याशी मुद्दाम खेळायला लावायचे. हात धरून उड्यासुध्दा मारून घ्यायचे. तिला येईल तसा नाच करायला लावायचे.

सांगायची गंमत म्हणचे सहा महिन्यात तिचे पोट थोडे कमी झाले. डॉक्टरांनी थोडे आणखी आपण थांबू असे सांगितले. तिचे वडील हे सांगायला शाळेत रजा घेऊन आले. आणि त्याचे श्रेय ते मला देत होते. आमच्याकडची दोन वर्ष तिची झाली. त्यात तिचे पोट निम्यापेक्षा कमी झाले आणि डॉक्टरांनी सांगितले आता ऑपरेशनची गरज नाही. ती आपोआप हालचाल करण्यानी सुधारेल.

ती पहिलीत गेली त्यावर्षी ते पालक मुद्दाम आमच्या पालकसभेला आले आणि म्हणाले मला ह्या पालकसभेत बोलायचे आहे. आमच्या मोठ्या बाईंनी त्यांना परवानगी दिली.

तिची आई बोलली. त्यामध्ये माझे त्यांनी कौतुक करून आभार मानले. मग तिचे वडील बोलायला उभे राहिले पण त्यांना डोळ्यात येणाऱ्या अश्रूमुळे बोलताच येत नव्हते. फक्त ते एवढेच म्हणाले, 'आम्हाला जे जमलं नाही, जे आईसुध्दा करू शकली नाही, ते ह्या ताईनी करून दाखवले आणि माझ्या मुलीला नवीन जन्म मिळाला.'

हा एक प्रकारचा माझा सत्कारच होता. आणखी काय पाहिजे? मी धन्य झाले!

***


**पुणे विशेषांकासाठी हार्दिक शुभेच्छा!**



**सौ. अरुणा व**
**श्री. अरविंद वासुदेव मराठे**
**५५, पवनानगर, चिंचवड गाव,**
**पुणे - ४११ ०३३**

# व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र

**संचालिका - सौ. नीलांबरी रमेश मराठे M.A.M.Ed**

**I.Q आणि Aptitude चाचण्या देऊन शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन केले जाते.**

**वेळ : सकाळी १० ते १, सायंकाळी ५ ते ८.**

**वधूवर सूचक मंडळ सोमवार, मंगळवार सायंकाळी ६ ते ८**

**६४३ नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक,**
**प्राथमिक नू. म. वि. शाळेसमोर,**
**पुणे - ४११ ०३०**
**(☎ - ४४५६२७०)**

# मराठे प्रतिष्ठान पुणे विभाग यांस हार्दिक शुभेच्छा !

## विद्युत कॉर्पोरेशन

राणकपूर दर्शन, आळंदीरोड, पुणे - ४११ ००६.

**टि.व्ही., फ्रीज, मिक्सर्स, पंखे व इतर ग्राहकोपयोगी वस्तूंचे विक्रेते.**

☎ : ६६९४२६०

मा. विंग कमांडर (नि.) य. ल. मराठे.

## स्टँडर्ड कन्स्ट्रक्शन्स्

सिव्हिल आणि स्ट्रक्चरल इंजिनियर्स,
कम्युनिकेशन सिस्टीम इन्स्टॉलेशन व
मॅन्युफॅक्चर ऑफ मास्टस् १० फूट ते ३०० फूट
टेली फॅक्स : ६६८६५८०
मा. विनायक मराठे


Marathe Pratishthan

# एअर कमोडोर मधुकर कृष्ण

**माधव वासुदेव** (पृ. ३८६) पुणे

मराठे परिवारातील कुलबांधवांनी स्वकर्तुत्वाने अनेक क्षेत्रात दैदीप्यमान यश मिळवले आहे. पण प्रसिध्दीचा हव्यास नसल्याने, कर्तुत्वाचा आलेख समाजासमोर येऊ शकला नाही. मराठे परिवाराला ही आपल्यातील अशा स्वयंप्रकाशी ताऱ्यांची माहिती नाही. अशा पैकी एक लखलखता तारा म्हणजे एअर कमोडोर मधुकर कृष्ण मराठे (निवृत्त)



**मधुकर कृष्ण** (पृ. ३८६) हे मूळचे नाशिकचे. नाशिक रोडच्या सिक्युरिटी प्रेसमध्ये वरिष्ठ अधिकारी असलेल्या कै. श्री. कृष्णराव धोंडो मराठे यांचे द्वितीय चिरंजीव. शालेय शिक्षण नासिकरोडच्या पुरुषोत्तम महाविद्यालयात झाले. त्यानंतर पुणे येथील फरग्यूसन महाविद्यालयात ते दाखल झाले व पुढे पुणे इंजिनिअरिंग महाविद्यालयातून त्यांनी बी. ई. (इलेक्ट्रिकल, मॅकॅनिकल) पदवी संपादन केली. महाविद्यालयात असताना त्यांनी अनेक क्रीडा प्रकारात भाग घेऊन मानाचे चषक मिळवले.

बी. ई. पदवी मिळवल्यानंतर निराळ्या वाटेने त्यांनी जायचे ठरवले. वास्तविक १९६०-७० दशकात पुणे परिसरात अनेक कारखाने सुरू झाले होते. नामवंत कंपन्या होत्या. पण या युवकाने वायुसेनेत जाण्याचे ठरवले. वायुसेनादलाच्या तांत्रिक विभागात या युवकाची निवड झाली. चीन-भारत युध्दानंतर भारतीय सैन्यात, विशेषतः वायुसेना दलाच्या तांत्रिक विभागात जिद्दी युवकांची आवश्यकता होती. नवे तंत्रज्ञान आत्मसात करून भारतीय वायुसेनेची लढाऊ विमाने आधुनिक बनवून शूर वैमानिकाच्या हातात देणे हे एक मोठे आव्हान होते. म्हणून त्यांनी वायुसेनादलाच्या तांत्रिक विभागात काम केले. १९६५ व १९७१ च्या युध्दात प्रशंसनीय कार्य केले. वायुसेनादलात अनेक उच्चपदे त्यांनी भूषवली. एरॉनॉटिकल इंजिनिअरींग क्षेत्रातील उच्च शिक्षणही त्यांनी रशियात राहून प्राप्त केले.

भारतीय विमानदलामध्ये तंत्रज्ञान दृष्ट्या अत्यंत प्रगतिशील विमानांचा वापर सुरू करण्याच्या प्रक्रियेत त्यांचा मोठा वाटा आहे. नियोजनबध्द व भविष्यकालीन गरजांचा खोलवर विचार करून विविध योजनांची अंमल बजावणी करण्यात मधुकरराव आघाडीवर होते. या त्यांच्या दूरदृष्टीमुळे केवळ स्वयंपूर्णताच नव्हे तर परकीय चलनाची बचत करण्यात त्यांची विमानदलास बहुमोल मदत झाली.

एअर कमोडार मधुकरराव यांच्या असामान्य कर्तृत्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाब अशी की केवळ १२ वर्षाच्या काळात त्यांना एकापाठोपाठ एक अशी 'विशिष्ट सेवा मेडल (१९९२)' आणि 'अतिविशिष्ट सेवा मेडल (१९९६)' असे बहुमान प्राप्त झाले अशा तऱ्हेचा बहुमान मिळवणारे भारतीय विमानदलातील एअर कमोडोर मधुकरराव हे एकमेव वरिष्ठ अधिकारी आहेत.

३३ वर्षाच्या वायुसेना दलातील आपल्या दैदिप्यमान कामगिरीनंतर ते निवृत्त झाले. ते गेली पाच वर्षे पुण्यात स्थायिक आहेत. निवृत्तीनंतरही स्वस्थ न बसता विमानात नवे तंत्र वापरण्यासाठी कुठल्या साधनांची आवश्यकता आहे या विषयी तांत्रिक सल्लागार म्हणून ते काम करतात. ✱✱✱

# पाकीटमाराची 'भेट'!

**सौ. शुभदा शंकर**, पुणे

***गुरूप्रेमाचा तो साक्षात्कार पाहून मी मात्र हरवून गेले होते. मनात आलं, त्या शामच्या आई सारखी संस्कार करणारी आई याही शामला मिळाली असती तर?***

पुण्यातील नू.म.वि. मराठी शाळेत मी गेली २७ वर्षे शिक्षिका आहे. शाळेत मुलांच्या स्वभावाच्या अनेक छटा आम्ही अनुभवत असतो. पण माझा हा अनुभव मला खूप काही देऊन गेला.

१९४७ च्या सप्टेंबर महिन्यातील गोष्ट. ''बाई तुमची पर्स'' हे शब्द ऐकताच मी मागे वळून पाहिले. शामच्या हातात माझी पर्स होती. मी त्याच्याकडे वरवर हसल्यासारखे करून पर्स घेऊन घरी आले आणि प्रथम सर्व पैसे मोजले. सर्व काही जागच्या जागी होते. माझ्या जिवात जीव आला होता. त्याला कारणही तसेच होते. मी ज्या मुलांचा कार्यक्रम बसवायला जात होते ती रिमांडहोम मधील गुन्हेगार मुले होती. त्यात शाम इतर मुलांच्या मानाने १५-१६ वर्षाचा थोराड मुलगा होता. तो अट्टल पाकीटमार होता.

रिमांड होम मधील मुलांच्या पालकासाठीचा व पालकदिन म्हणून नाच, नाटक, गाणी असा कार्यक्रम बसवत. मी माझी शाळा सांभाळून त्या मुलांसाठी जात असे. तो दिवस शनवारचा होता. सकाळची शाळा संपवून मी रिमांड होम मध्ये निघाले. शाळेची फी पण बरीच जमा झालेली होती. त्यामुळे पर्समध्ये ६०० रुपये होते. आम्ही ज्या खोलीत प्रॅक्टिस करीत होतो तेथील खुंटीला मी पर्स अडकवली होती. ज्या मुलाबद्दल मला सांगितले होते तो नेमका पर्स जवळच उभा होता. मुलांच्या बरोबर मी नाचत गाणी म्हणत होते. फिरत होते पण माझे खरे लक्ष पर्सवरच होते. मुद्दाम तेथून उचलून दुसरीकडे ठेवली तर ते माझ्यातील शिक्षकी स्वभावाला पटणारे नव्हते. कारण तसे मी करणे म्हणजे त्या मुलावर अविश्वास दाखविण्यासारखे होते. काय करावे काही सुचत नव्हते. माझ्या मनात विचार आला, समजा याने आपले पैसे घेतले तर? आपण शाळेचे पैसे कसे भरणार? एक दीड तासात मी निघाले. शामनेच माझ्या हातात माझी पर्स आणून दिली.

यापुढे पर्समध्ये जास्त पैसे घेवून यायचे नाही असे मी पक्के ठरविले आणि मग रोजचा कार्यक्रम मी येणे, प्रॅक्टिस घेणे, आठ दिवस सुरू होते. शाम रोज एकटक पाहत असायचा. एक



Marathe Pratishthan

दिवस तो माझ्या जवळ आला आणि म्हणाला ''बाई मी तुम्हाला गाणे म्हणून दाखवू का? तुम्ही सांगितले तर मला पण स्टेजवर यायला मिळेल.'' मी हो म्हटले. त्याने मला फकीरा सिनेमातील 'चल फकीरा चल' हे गाणे म्हणून दाखवले. त्याचा आवाज फारच छान होता. मग पेटी, तबल्याच्या साथीवर त्याचे गाणे बसवून घेतले. 'अरे शाम तुझा आवाज खूप छान आहे तू पुढे गाणं शीक, मोठा हो!' माझे शब्द ऐकून त्याला खूप आनंद झाला आहे हे मला जाणवत होते.

ठरल्याप्रमाणे पोलीस रिक्रिएशन हॉल मध्ये या मुलांचा कार्यक्रम खूपच छान झाला. आपल्या मुलांना स्टेजवर रंगीबेरंगी कपडे, मेकअप केलेला पाहताना त्यांच्या पालकांना होणारा आनंद लपून रहात नव्हता. शामने स्टेजवर सुंदर आवाजात गाणे म्हटले. टाळ्यांचा कडकडाट होताना विंगमधून मी कौतुकाने पहात होते.

सर्व कार्यक्रमानंतर माझाही पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार केला. केवळ मला आवड असल्यामुळेच मी हे काम विनामोबदला स्वीकारले होते. हॉलमध्ये सर्व मुलांना द्रोणातून लाडू व चिवडा देण्यात आला.

मी सर्वांचा निरोप घेऊन हॉल सोडून बाहेर पडत होते. इतक्यात..... 'बाई, बाई थांबा' अशी हाक आली. मी मागे वळून पाहिले. तो शाम होता. हातात द्रोण होता. तो लाडू चिवड्याचा द्रोणाचा हात पुढे करून म्हणाला ''बाई तुमच्यामुळे गायला मिळाले. ही माझी भेट समजा'' शामच्या पाठीवर हात ठेवत मी म्हणाले, ''शाम, इथून बाहेर पडल्यावर काहीतरी चांगला करून दाखव.'' शामच्या आणि माझ्याही डोळ्यात पाणी आलं होतं!

***

# देव कोणाच्या तरी रूपाने मदत करतो

**श्रीमती प्रमिला भालचंद्र** (पृ. ३९०) पुणे.

१९६१ सालच्या जानेवारी महिन्यातील ही घटना आहे. पुणे शहर महिला मंडळाची ट्रीप काढायचे ठरले. कोयना, पोफळी, परशुराम, सातारा वगैरे ठिकाणे पाहण्याचे ठरले. आम्ही चाळीस भगिनी होतो. स्वतंत्र एस. टी. करून निघालो होतो. कोयना, पोफळी, परशुराम वगैरे पाहून परतीचा प्रवास सुरू झाला. आम्हाला दिलेली गाडी चांगली नव्हती म्हणून सातारला गाडी बदलून घेतली. आमच्या गाडीच्या ड्रायव्हरला घाटांतून गाडी चालवण्याचा सराव कमी असावा. कारण तो घाटांत सफाईदार गाडी चालवत नव्हता.

सातारा सोडल्यावर खंडाळा घाटातील उंच ठिकाणी देवीचे टाके आहे. तेथून गाडी येत असताना ब्रेक नीट लागत नाहीत हे लक्षात आले. ब्रेक लावल्यावर खालच्या बाजूने ठिणग्या पडत होत्या. मागील बाजूचे लोक इशारा करीत असावे. गाडी पेटण्याची शक्यता त्यांना वाटत असावी. आमच्या गाडीच्या ड्रायव्हरने गाडीचा वेग कमी केला होता. गाडी डोंगराच्या बाजूवर आपटून थांबवण्याचा त्याचा विचार असावा. मी पुढेच बसले होते. घाट केव्हा संपतो असे मला वाटत होते.

धोका असल्याची जाणीव सर्वजणींना वाटत होती. घाटात अंधार खूपच होता. मी चालत्या गाडीतून उडी मारली. थोड्या अंतरावर गाडी एका ट्रकवर आदळून थांबली. मी तिथपर्यंत चालत गेले. ट्रकचा ड्रायव्हर शीख होता. तो आमचे गाडीच्या ड्रायव्हरला मारण्यासाठी आरडाओरडा करीत आला. आमच्या गाडीच्या ड्रायव्हरने व्हीलवर डोके टेकले होते. क्षणभर तो स्तब्ध होता. मी त्या शीख ड्रायव्हरला हिंदीतून जोराने सांगितले ''ठहरो, त्याला मारू नका. काय झाले आहे ते समजून घ्या.''

अशा रात्रीच्या वेळी बाईचा आवाज ऐकून तो आश्चर्यचकित झाला. आमच्या गाडीतील सर्व भगिनी खाली उतरून रस्त्याच्या कडेला थांबल्या. दोन्ही बाजूच्या गाडीतील ड्रायव्हर मला सांगू लागले 'अहो बाई आम्ही तुम्हाला शिरवळला, वाईला नेतो. तेथून पंचनाम्यासाठी पोलीस घेऊन येऊ' मी म्हटले एस. टी. चे ड्रायव्हर कोण आहेत त्यांच्याशी मी बोलेन.

कोल्हापूर गाडीचे श्री. खान व रत्नागिरी गाडीचे ड्रायव्हर पुढे आले. त्यांनी त्यांचे ओळख पत्र दाखवले. मी त्या दोघांना सांगितले गाडीचे ब्रेक बरोबर नसल्याने ट्रकवर गाडी आपटून थांबवावी लागली. ट्रकचे नुकसान झालेले नाही. अगदी मामुली स्वरूपाचे आहे. आम्ही सर्व भगिनी ट्रीपमधून घरी चाललो आहोत. तुम्ही दोघांनी शीख ड्रायव्हरला समजाऊन दिल्यास बरे पडेल. आम्हा भगिनींची सोय लाऊन देण्याची मी त्या दोघा ड्रायव्हरना विनंती केली. त्याचप्रमाणे आमची गाडी बाजूला काढून घाट मोकळा करून सर्वांची सोय करावी अशी मी त्या दोघांना विनंती केली.

त्या प्रमाणे त्या दोघांनी ड्रायव्हरची समजूत घालून घाट मोकळा केला. दोघांच्या गाडीतून आम्हाला पुण्याला नेण्याचे मान्य केले. परंतु मी म्हटले, आम्ही सर्वजणी एकाच गाडीने जाऊ. श्री खान म्हणाले माझ्या गाडीने मी नेतो. परंतु काही जणींना शिरवळ पर्यंत उभे राहावे लागेल. मी चालेल म्हटले. सर्वजणींचे सामान रत्नागिरी गाडीत ठेऊन प्रत्येकीने फक्त पर्स घेऊन कोल्हापूर गाडीत प्रवेश केला.

रात्री १.३० चे सुमारास आम्ही स्वारगेटला गेलो. मी ऑफिस मध्ये जाऊन फोन करू का? म्हणून विचारले परंतु नाही म्हणून उत्तर मिळाले. परंतु तेवढ्यात खान पुढे आले व त्यांनी ॲक्सीडेंट झाल्याचे सांगितल्यावर, वस्तुस्थिती समजल्यावर, त्यांनी आम्हाला एस.टी. ने घरोघर पोचवले. दुसरे दिवशी सर्व भगिनींचे सामान व्यवस्थित मिळाले.

गाडी दरीत कोसळली असती तर काय झाले असते, याची कल्पना करवत नाही. सर्व भगिनींना घरोघर पोचवून पहाटे तीनच्या सुमारास घरी आले. घरी सर्वजण काळजी करीत होते. कारण आम्ही रात्री १० पर्यंत घरी येणार होतो. काही जरूरीच्या कामासाठी मुंबईला मला लगेच जायचे होते. श्री खान भेटले नसते तर व्यवस्था होईपर्यंत घाटात थंडीत कुडकुडत बसावे लागले असते. देव कुणाच्या तरी रूपाने मदतीचा हात देतो हेच खरे!

***



Marathe Pratishthan

# दासबोध ग्रंथातून प्रकट झालेले श्री समर्थ

**प्रभाकर गजानन** (पृ. ३९०) पुणे

मी नोकरीतून निवृत्त झाल्यावर पत्र द्वारा दासबोध अभ्यास या उपक्रमाचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे तीन वर्षे समीक्षक म्हणूनही काम केले. या उपक्रमांमुळे व निंबाळकरांच्या दासबोधातील समास वाचनामुळे श्री समर्थ व दासबोधग्रंथाची मला प्राथमिक माहिती होत गेली. त्या आधारेच हे मनोगत लिहिण्याची संधी मला मिळाली.

श्री समर्थांचा जन्म शके १५३० (इ.स. १६०८) मध्ये म्हणजे सुमारे ३९० वर्षापूर्वी, चैत्री नवमीला मराठवाड्यातील जांब या गावी ठोसर कुटुंबात झाला. श्री समर्थांचे नामकरण नारायण असे करण्यात आले. दुर्दैवाने वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरपले. त्यामुळे श्री समर्थ अंतर्मुख झाले. श्री समर्थ हे लहानपणी फार अवखळ (व्रात्य) होते, म्हणून मातोश्री त्यांना रागे भरत. एकदा श्री समर्थ रागाच्या भरात घरातील अडगळीच्या खोलीत चिंताग्रस्त होऊन बसले. घरातील सगळ्यांना काळजी लागली व त्यांची शोधाशोध सुरू झाली. त्यांच्या मातोश्री खोलीत आल्यावर नारायणाला त्यांचा पाय लागला. मातोश्रींने विचारले कोण आहे? तेव्हा नारायण म्हणाले 'मी आहे.' अरे येथे अडगळीच्या खोलीत अंधारात बसून काय करतोस, असे मातोश्रींनी विचारताच 'आई, चिंता करतो विश्वाची' असे उत्तर आले. यावरून लक्षात येईल की अगदी लहान वयातच श्री समर्थांना जगोध्दाराची काळजी लागली होती.

रितीरिवाजाप्रमाणे वयाच्या १२ व्या वर्षी नारायणास बोहल्यावर उभे केले. परंतु 'सावधान' हा शब्द ऐकून ते बोहल्यावरून पळून गेले. पुढे, नाशिक जवळील गोदावरी काठी असलेल्या श्री क्षेत्र टाकळी येथे त्यांनी १२ वर्षे अतिशय तपस्वी, वैराग्य वृत्तीने, एकाग्र मनाने रामोपासना केली. नारायणाची निस्सीत भक्ती पाहून श्री मारुतीरायाने श्री रामाकडून नारायणास मंत्रोपदेश दिला. अशाप्रकारे नारायणाचा 'रामदास' होऊन श्री प्रभूरामचंद्र अंतर्धान पावले.

श्री समर्थांनी नंतर कृष्णातीरी श्री क्षेत्र मसूरी येथे रामनवमीचा पहिला उत्सव साजरा केला आणि लोकसंग्रह व जनजागृतीचा पाया घातला. त्याच सुमारास महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला (द. ११ स. ५ व द. १९ स. ९) श्री शिवाजी महाराजांनी श्री समर्थांचे गुरूत्व पत्करले व त्यांच्याकडून अनुग्रह घेतला. श्री शिवाजी महाराजांनी राज्याची सनद भिक्षा म्हणून समर्थांच्या झोळीत टाकली असताना या राष्ट्रगुरूने प्रभूरामचंद्र हेच माझे सर्वस्व असल्याने ती भिक्षा सन्मान पूर्वक महाराजांना परत केली. केवढी ही त्यागी वृत्ती!

श्री समर्थांना उपासनेअंतर्गत श्री रामभक्त हनुमानाचे मार्गदर्शन होत असे. श्री मारुतीरायाची बुध्दिमत्ता, बलोपासना प्रत्येकाने जोपासावी म्हणून त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी मारुती मंदिरांची त्या काळी उभारणी करून, तेवढेच म्हणजे ११ मठ स्थापून, मठाधिपतीम्हणून महंतांची नेमणूक केली (द. ११ स. १० व द. १५ स. २) महंत हे अंतरात्म्यासारखे असावे ह्याचे विवरण द.१२९ मध्ये पाहण्यास मिळते. प्रतापगडावर शके १५८३ मध्ये देवीची स्थापना करून शके १५९६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्याभिषेकाप्रसंगी श्री समर्थ जातीने हजर होते व महाराजांना ''आनंदत्रिभुवन'' निर्माण करा असा आशीर्वाद त्यांनी दिलेला होता.

श्री समर्थांना आळशी माणसाची फार चीड असे. आळशी माणसास ते आत्महत्यारा समजत (द. ११३) लोकसंग्रह व जनजागृती करण्यासाठी भारत हे उत्तम माध्यम आहे हे जाणून समर्थांनी मराठी, हिंदी, संस्कृत व उर्दू भाषांवर प्रभूत्व मिळवले.

श्री समर्थांनी स्वतः प्रपंचात न पडता प्रापंचिकांनी प्रपंचात कसे वागावे याचे अत्यंत सूक्ष्म व व्यावहारिक निरीक्षण करून, प्रपंचात राहूनच परमार्थ किंवा आध्यात्मिक प्रगति साधता येते याचे सखोल व समर्पक वर्णन निरनिराळ्या समासाद्वारे करून ठेविले आहेत असे मला वाटते. त्यातील द. १२ स. १ हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे.

दासबोधग्रंथ हा गुरू व शिष्य यांचा प्रश्नोत्तररूपी संवाद आहे व त्यामध्ये २० द व २०० समासाद्वारे (एकूण ७७५१ ओव्या) प्रपंच व परमार्थ या दोन आघाड्यावरील व्यावहारिक गुण-दोषांचा, त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय स्तरावरील व्यवस्थेचा अगदी सूक्ष्म अभ्यास व निरीक्षण करून हा ग्रंथ अजरामर करून ठेविला आहे. खालील सूत्रे जर पाहिली तर श्री समर्थांना काय अभिप्रेत आहे हे सहज लक्षात येईल.

१) यत्न तो देव जाणावा। यत्नेविण दरिद्रता।
२) आधी ते करावे कर्म। कर्म मार्गे उपासना।
३) या शरीर यंत्राऐसे। यंत्र आणिक नाही।
४) प्रपंच करावा नेटका
५) विवेकाचे फळ ते सुख।
६) प्रपंची जो सावधान। तोचि परमार्थ करील जाण।

श्री ज्ञानेश्वरांचे पसायदान हे जसे प्रातिनिधिक (Representative) आहे, त्याचप्रमाणे दासबोधातील द. २० स. १० मधील ओ. क्र. २६ ते ३७ ह्या सुध्दा दासबोधाचे पसायदानच आहे. जय जय रघुवीर समर्थ । ***

## भामटिणीपासून सावध

एक मध्यमवयीन बाई आशा मराठे नाव सांगून, मराठे प्रतिष्ठानचे काम मी करते, तुम्हाला कुलवृत्तान्त हवा असल्यास आणून देईन असे सांगून आपुलकी निर्माण करते आणि ''श्रीराम मंदिर, मु. महान, ता. बार्शी टाकळी, जि. अकोला'' छापलेली पावती देऊन मराठे कुटुंबीयांकडून पुणे परिसरात (आणि सोलापुरातही) पैसे गोळा करते असे समजले आहे.

पुण्यातल्या प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी अधिक चौकशी केली असता मराठ्यांशिवाय अन्य कुळांतल्याही लोकांकडून अशाच तऱ्हेने पैसे गोळा करण्यात येतात असे समजले.

तरी कुलबांधवांनी सावधानता बाळगावी. विदर्भात अथवा अन्य भागांत आशा मराठे या नावाची कोणीही बाई प्रतिष्ठानचे काम करीत नाहीत याची नोंद घ्यावी. ***



Marathe Pratishthan

## या अंकात


१. असे होते सुरेशभाऊ - कुलबांधवांच्या प्रतिक्रिया ........ पृ.१
२. प्रतिक्रिया - या युवकांना झालंय तरी काय? ........ पृ.६
३. पुण्यातील २१वा वर्धापनदिन सोहळा : २६.१.२००० पृ.८
४. पुणे शाखेचे मनोगत ........ पृ.१०
सौ. नीलांबरी रमेश
५. ज्ञाननगरी - पुण्यनगरी ........ पृ.११
माधव वासुदेव
६. सुखाचा शोध ........ पृ.१२
मीननाथ लक्ष्मण
७. वरुण (कविता) ........ पृ.१२
स्वाती गजानन अभ्यंकर
८. तारेवरची कसरत - एका तुरुंगाधिकाऱ्याची ........ पृ.१३
अच्युत महादेव चक्रदेव
९. विवेकानंद केंद्र - त्याग व सेवेचे प्रतीक ........ पृ.१५
सौ. अरुणा अरविंद
१०. छोट्या मुलीच्या ताईचा खूपऽ खूपऽ मोठा गौरव ........ पृ.१५
सौ. मंजिरी मोहन
११. एअर कमोडोर मधुकर कृष्ण ........ पृ.१७
माधव वासुदेव
१२. पाकीटमाराची 'भेट' ........ पृ.१७
सौ. शुभदा शंकर
१३. देव कोणाच्या तरी रूपाने मदत करतो ........ पृ.१८
श्रीमती प्रमिला भालचंद्र
१४. दासबोध ग्रंथातून प्रकट झालेले श्री समर्थ ........ पृ.१९
प्रभाकर गजानन
१५. भामटिणीपासून सावध ........ पृ.१९

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.४), **सभासद वृत्त** (पृ.५), **खुषीपत्रे** (पृ.५), **विवाह साहाय्य** (पृ.७) आणि **हसरे हितगुज** (पृ.१४) ही नेहमीची सदरे.


**बुक पोष्ट**

**प्रति**


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan